cmyk

## संपादकीय

### दादा नंतरचा यक्षप्रश्न कलाटणी देणारा असेल...

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कणखर नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला बळकटी आलेली होती. राज्यात भाजप स्वबळावर सत्तेवर आहे. तरीदेखील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांना अगोदर ठरल्याप्रमाणे एकत्र घेऊन देवेंद्र फडणवीस राज्य चालवीत आहेत.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२७३ | शनिवार दि.३१ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### दुसऱ्याच दिवशी सोने, चांदीचे दर घसरले

जळगाव :शहरातील सुवर्ण बाजारपेठेत गुरुवारी दिवसभरात चांदीचे दर चार लाखांवर, तर २४ कॅरेट सोन्याचे दर एक लाख ८० हजारांवर पोहोचले होते. परंतु, शुक्रवारी सकाळी बाजार उघडताच दोन्ही धातूंच्या दरात मोठी घसरण झाली. उच्चांकी दरवाढीला अचानक ब्रेक लागल्याने ग्राहकांना ब–यापैकी दिलासा मिळाला. दोन्ही मौल्यवान धातूंच्या बाजारात शुक्रवारी मोठी उलथापालथ पाहायला मिळाली. गेल्या काही सत्रांत सातत्याने विक्रमी पातळी गाठल्यानंतर सोने आणि चांदीच्या किमतींमध्ये अचानक मोठी घसरण झाली.शुक्रवारी सकाळीसोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ७५ हजार १०० रुपयांपर्यंत घसरले.

### अजित 'दादां' समर्थकाचा हार्ट अटॅकने मृत्यू

नाशिक : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचा धक्का सहन न झाल्यामुळे नाशिकमधील राष्ट्रवादीच्या एका पदाधिका–याचा मृत्यू झाला. अजित पवारांचे कट्टर समर्थक आणि पदाधिकारी सुदाम बोडके यांचे हृदविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. अजित पवारांच्या निधनाचे वृत्त ऐकून सुदाम बोडके यांना मोठा धक्का बसला होता. ते खूपच अस्वस्थ झाले होते. त्यानंतर त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांचा मृत्यू झाला,अजित पवार यांच्या निधनाची बातमी समजल्यानंतर तीव्र धक्का बसल्याने मृत्यू झाला. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील ढकांबे गावातील ही घटना आहे.

### वसईत ठाकरे बंधूंबाबत आक्षेपार्ह पोस्ट

वसई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विरोधात एका तरुणाने अपशब्द उच्चारत समाजमाध्यमावर टीका केली आहे. या टीकेनंतर मनसे कार्यकर्त्यांनी या तरुणाला शोधून काढत चांगलाच चोप देत धिंड काढली. त्याचा व्हीडीओही मोठ्या प्रमाणात समाज माध्यमावर व्हायरल होत आहे. नुकतेच नालासोपारा येथील एका तरुणाने मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे आणि शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबद्दल अर्वाच्च भाषेत वक्तव्य करून त्याचा व्हीडीओ सोशल मीडियावर टाकला होता. ही आक्षेपार्ह पोस्ट टाकणे या तरुणाच्या चांगलेच अंगलट आले आहे.

### दिवंगत अजित दादांना मंत्रालयात श्रद्धांजली

मुंबई : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल मंत्रालयातील अधिकारी–कर्मचा–यांच्या वतीने मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित शोकसभेत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या सेवाकाळात नेहमी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्य भावनेने शासकीय कर्तव्य पार पाडले. त्यांच्या निधनाने राज्य शासनाने एक कर्तव्यदक्ष, शिस्तबद्ध आणि वक्तशीर नेतृत्व गमावले आहे, अशी भावना अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी उपस्थितांच्या वतीने या वेळी व्यक्त केली.

### अजितदादांनंतर राष्ट्रवादीला आणखी एक धक्का

पुणे : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या धक्क्यातून पवार कुटुंबासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील नेते मंडळी, कार्यकर्ते अद्याप सावरलेले नाही. अशातच पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या आणखी एका शिलेदाराचं निधन झाल्याचं धक्कादायक वृत्त आलेलं आहे. पुणे शहराचे माजी महापौर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शांतीलाल सुरतवाला यांचे आज, शुक्रवारी पहाटेच्या सुमारास दुःखद निधन झाले.शांतीलाल सुरतवाला यांनी वयाच्या ७६ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही काळापासून ते कॅन्सर या गंभीर आजाराशी झुंज देत होते.

### अजितदादांच्या स्मरणार्थ स्मारक उभारावं

पिंपरी–चिंचवड : स्वर्गीय अजित पवार यांच्यावर केलेल्या टीकेरवरुन चर्चेत आलेले भाजप आमदार महेश लांडगे यांनी आता अजित पवारांच्या स्मारकासाठी पाऊल टाकले आहे. पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या आवारात अजित पवार यांचे ब्राँझ धातूचे स्मारक उभारण्याची त्यांनी मागणी केली आहे. सध्या चिंचवड येथे पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या प्रशासकीय इमारतीचे काम सुरू असून, या इमारतीच्या समोरच स्वर्गीय अजित पवार यांचे ब्राँझ धातूचे स्मारक उभारावे, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.

# सोयाबीनची आवक घटली मात्र दर मजबूत

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील सोयाबीन बाजारात सध्या संमिश्र चित्र दिसून येत असून, ''विकायचं की थांबायचं'' या प्रश्नावर शेतकरी संभ्रमात आहेत. काही बाजार समित्यांमध्ये दरात वाढ दिसून आली, तर काही ठिकाणी दर स्थिर किंवा किंचित घटलेले नोंदवले गेले. मात्र, एकूण आवक घटलेली असतानाही दर्जेदार पिवळ्या सोयाबीनला व्यापाऱ्यांकडून जोरदार मागणी कायम असल्याने दर मजबूत राहिले आहेत.**



राज्यातील प्रमुख बाजार समित्यांमध्ये सोयाबीनची एकूण आवक सुमारे ६,३७५ क्विंटल इतकी नोंदवण्यात आली असून, मागील व्यवहार दिवसाच्या तुलनेत ही आवक कमी आहे. अनेक शेतकऱ्यांकडे सध्या विक्रीयोग्य साठा कमी असून, काही शेतकरी भाव वाढीच्या अपेक्षेने माल बाजारात आणत नसल्याचे दिसून येते. तसेच कापूस, हरभरा आणि गहू या पिकांच्या कामांमध्ये शेतकरी व्यस्त असल्यामुळेही सोयाबीनची आवक घटल्याचे जाणकारांनी सांगितले. दरांच्या बाबतीत पाहिले असता, आज सोयाबीनचा सरासरी दर सुमारे ५,५३३ रुपये प्रति क्विंटल राहिला. काही बाजारांत कमाल दर ५,९११ रुपये, तर किमान दर ४,००० रुपये प्रति क्विंटल नोंदवण्यात आला. अहमदपूर, औराद शहाजानी, यवतमाळ, तुळजापूर आणि सिंदी (सेलू) या बाजारांत ५,७५० ते ५,९०० रुपयांच्या दरम्यान व्यवहार झाले. पिवळ्या सोयाबीनला सध्या सर्वाधिक मागणी दिसून येत आहे. यवतमाळ, अहमदपूर आणि औराद शहाजानी या बाजारांत मोठ्या प्रमाणात आवक असूनही दर टिकून राहिले आहेत. तेल गिरण्या आणि मोठे व्यापारी पिवळ्या सोयाबीनला प्राधान्य देत असल्यामुळे या जातीचे दर मजबूत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. दुसरीकडे, पांढऱ्या सोयाबीनला मर्यादित मागणी दिसून आली. नागपूर, जळकोट आणि सावनेर या भागांत पांढऱ्या सोयाबीनचे दर तुलनेने कमी राहिले असून ५,००० ते ५,३०० रुपये प्रति क्विंटल दरम्यान व्यवहार झाले. दर्जा ▶▶ पान २ वर

# तर आजच सुनेत्राताईंचा शपथविधी–भुजबळ

पुणे । प्रतिनिधी

**आम्ही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटलो. त्यावेळी प्रफुल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडे उपस्थित होते. आजही आम्ही मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेदी निवड व्हावी यासाठी पक्षातील नेते, आमदार आग्रही आहेत. आम्ही ही बाब उद्याच्या बैठकीत सुनेत्रा वहिनींच्या कानावर घालू. त्यांचं मत जाणून घेऊ. शक्य झाल्यास उद्याच त्यांचा शपथविधी होईल. या सगळ्यामध्ये प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे लक्ष घालत आहेत,' असं भुजबळ यांनी सांगितलं.**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्र शोकसागरात लोटला गेला आहे. अजित पवार यांच्या पार्थिवावर काल बारामतीत अंत्यसंस्कार झाले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घडामोडींना वेग आला आहे. खासदार प्रफुल पटेल, सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या बैठकीला मंत्री छगन भुजबळ , धनंजय मुंडेदेखील हजर होते.विधिमंडळ गटनेता ठरवण्यासाठी उद्या पक्षाच्या नेत्यांची बैठक होईल. त्यात सुनेत्रा पवार यांचं नाव निश्चित होण्याची दाट शक्यता आहे. याबद्दलचा निर्णय झाल्यास उद्याच शपथविधी होण्याची शक्यता मंत्री छगन भुजबळ यांनी बोलून दाखवली आहे. अजित पवार यांच्या अस्थींचं विसर्जन आज करण्यात आलं. धार्मिक विधी सुरु आहेत. मृत्यूनंतर काही ठिकाणी ३ दिवस, तर काही ठिकाणी १० दिवसांचा दुखवटा असतो. त्यानंतरच कुटुंबीय ▶▶ पान २ वर

# अजित पवारांच्या शब्दपूर्तीसाठी शरद पवार पुन्हा सक्रिय

बारामती । प्रतिनिधी

**राज्याच्या राजकारणात कायम सक्रिय आणि निर्णायक भूमिका बजावणारे नेते म्हणून ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राजकीय वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मात्र या दुःखद घटनेनंतरही राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे.**



आपल्या मुलासमान असलेल्या पुतण्याच्या निधनाचे गहिरे दुःख उराशी बाळगत शरद पवार यांनी आज अजित पवार यांचा सावडण्याचा विधी पार पाडला. हा विधी अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. मात्र या दुःखातून त्यांनी स्वतःला सावरले. त्यांनी थेट जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देत नीरा ▶▶ पान २ वर

# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे पनवेलमध्ये होणार मुख्यालय

## एक रुपया दराने ६००० चौ. मी.चा भूखंड राज्य शासनाकडून नियोजन विभागाकडे

मुंबई–बीड । प्रतिनिधी

आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना सोयर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून शेतीपूरक व्यवसाय वाहतूक प्रक्रिया यासाठी अर्थसहाय्य करणे मराठा समाजाचा यात सहभाग वाढविणे हे उद्दिष्ट असलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची मुख्यालयाची इमारत आता पनवेलमध्ये होणार आहे त्यासाठी एक रुपया प्रति चौरस मीटर या दराने सहा हजार चौरस मीटर जागा शासनाने नियोजन विभागाकडे वर्ग केली आहे.

शुक्रवार दिनांक ३० रोजी महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी लक्ष्मीकांत जाधव यांनी काढलेल्या शासन आदेशामध्ये नमूद केले आहे की अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ मुंबई यांच्या मुख्यालय व बहुउद्देशी इमारतीसाठी पनवेल पश्चिम ▶▶ पान २ वर

# सुप्रीम कोर्टाने शाळा व्यवस्थापनाला खडसावले

## मुलींना मोफत सॅनिटरी पॅड द्या; स्वतंत्र शौचालये उभे करा

नवीदिल्ली । वृतसंस्था

**सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी देशातील सर्व खासगी आणि सरकारी शाळांना मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वाटणे बंधनकारक करण्याचे निर्देश दिले. मुलांसाठी आणि मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधली पाहिजेत. ज्या शाळांनी असे केले नाही त्यांना मान्यता रद्द करावी लागेल.असा असे आदेश दिले हे निर्देश देशातील खाजगी आणि शासकीय शाळाना व त्यांच्या व्यवस्थापनाला दिले आहेत.**



न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना प्रत्येक शाळेत अपंगांसाठी अनुकूल शौचालये बांधण्याचे निर्देश दिले. केंद्र सरकारच्या मासिक पाळी स्वच्छता धोरणाची देशभर अंमलबजावणी करण्याची मागणी करणाऱ्या जया ठाकूर यांनी २०२४ दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला. जर शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालये नसतील तर ते संविधानाच्या कलम १४ (समानतेचा अधिकार) चे उल्लंघन करते. सॅनिटरी पॅडशिवाय मुली त्यांच्या अभ्यासात आणि अभ्यासेतर उपक्रमांमध्ये मुलांसोबत समान सहभाग घेऊ शकत नाहीत. मासिक पाळीच्या वेळी आदरयुक्त काळजी मिळणे हा संविधानाच्या कलम २१ चा भाग आहे (जीवन आणि सन्मानाचा अधिकार). जर मुलींना ▶▶ पान २ वर

# सत्ता मिळवण्यासाठी राज्याचे वाटोळे –विजय वडेट्टीवार

मुंबई । प्रतिनिधी

**विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्य दिवाळखोरीत निघाले आहे. निवडणूक जिंकण्यासाठी रेवडी वाटल्या जात आहेत. त्यामुळे राज्याची आर्थिक परिस्थिती न बघता केवळ सत्ता मिळवण्यासाठी राज्याचे वाटोळे करण्याचा अधिकार यांना दिला कोणी? असा सवाल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.**



राज्यावर महसुली तुटीचा बोजा वाढत आहे. 'लाडकी बहीण'सारख्या योजनांमुळे ▶▶ पान २ वर

# भूसंपादन लवादातील २४१ कोटींच्या घोटाळ्याची चौकशी फाईल 'गायब'?

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील भूसंपादन लवाद प्रकरणात उघडकीस आलेल्या तब्बल रु. २४१ कोटी ६२ लाखांच्या कथित आर्थिक भ्रष्टाचाराच्या चौकशी अहवालाबाबत जिल्हा प्रशासनाकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ होत असल्याचा गंभीर व धक्कादायक प्रकार समोर आला आहे. चौकशी पूर्ण होऊन त्यावर आधारित गुन्हे दाखल झाले असतानाही अधिकृत चौकशी अहवालच जिल्हाधिकारी कार्यालयातून 'गायब' झाल्याने प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.**

सूत्रांच्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील भूसंपादन लवाद प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांनंतर जिल्हा प्रशासनामार्फत एक अधिकृत चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने केलेल्या चौकशीत तत्कालीन ▶▶ पान २ वर


# सर्वसामान्यांचा ताण मिटणार आता येणार सुट्टे देणारे एटीएम

मुंबई । प्रतिनिधी

**यूपीआय चा वापर झपाट्याने वाढत असला तरी, बदलाची समस्या अजूनही कायम आहे. या समस्येवर उपाय म्हणून, भारत सरकार लहान चलनी नोटांची उपलब्धता वाढवण्याची तयारी करत आहे. अनेकदा, जेव्हा आपण चहा साठी ऑटो किंवा बसचे भाडे भरतो तेव्हा आपल्याला सुट्टे पैशाच्या अभावामुळे अनेक समस्येचा सामना करावा लागतो.त्यामुळे आता १०० किंवा ५०० च्या नोटा देऊन त्याबदल्यात १०, २० किंवा ५० च्या नोटाही घेऊ शकू अशा सुट्टे पैसे देणाऱ्या एटीएम मशीन बसवण्यात येणार आहेत त्याची ट्रायल मुंबईत सुरु आहे.**



वाढत्या यूपीआयच्या या युगातही, लहान दुकानदार, प्रवासी, रस्त्यावरील विक्रेते आणि रोजंदारी कामगारांसह अनेक लोक अजूनही दैनंदिन व्यवहारांसाठी रोख रक्कम वापरतात. सध्या, मुंबईत याचसाठी एटीएम मशीनची चाचणी घेतली जात आहे.आता तुम्ही एटीएम मधून १०, २० किंवा ५०च्या नोटा देखील काढू शकणार आहात. दररोज रोख व्यवहारांवर अवलंबून असलेल्या आणि ₹१०, ₹२० आणि ₹५० च्या नोटांची आवश्यकता असलेल्या लोकांना लहान चलनी नोटा सहज उपलब्ध व्हाव्यात हे सरकारचे उद्दिष्ट आहे. सरकारने यासाठी पायलट प्रोजेक्ट देखील सुरू केले आहेत. असाच एक पायलट प्रोजेक्ट मुंबईत राबवला जात आहे, जिथे लहान चलनी नोटांची उपलब्धता वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. रुग्णालये, बस डेपो, रेल्वे स्टेशन, स्थानिक बाजारपेठ, सरकारी रुग्णालये आणि कार्यालये यासारख्या जास्त रहदारीच्या ठिकाणी ही नवीन एटीएम मशीन बसवण्याची सरकारची योजना आहे जिथे लोकांना सर्वात जास्त रोख ▶▶ पान २ वर



# मद्यपान करणाऱ्या एसटी चालकांवर होणार जलद कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

एसटी महामंडळातील चालकांच्या मद्यपानाच्या प्रकारांबाबत गंभीर दखल घेत राज्य परिवहन महामंडळाच्या मुख्यालयाने कडक कारवाईचे निर्देश दिले आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने राज्यातील सर्व आगारांत चालकांची कर्तव्यावर जाण्यापूर्वी ब्रेथ ॲनालायझर चाचणी अनिवार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कर्तव्यावर असताना मद्यपान करणा–या चालकांविरुद्ध तातडीने आणि कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२.५० क्विंटल | २,६१० | ३,८३० | ३,१८० |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,७०० | ४,००१ | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १३६.५० क्विंटल | ४,४४१ | ७,८५१ | ७,३९१ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ४,८५० | ६,३०० | ५,५७५ |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,१५१ | ३,२६१ | २,७५४ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: १८४.०० क्विंटल | ४,९०० | ५,३०० | ५,१७१ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ६,७०० | ६,१३३ |

cmyk

अग्रलेख

# दादा नंतरचा यक्षप्रश्न कलाटणी देणारा असेल...

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कणखर नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला बळकटी आलेली होती. राज्यात भाजप स्वबळावर सत्तेवर आहे. तरीदेखील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांना अगोदर ठरल्याप्रमाणे एकत्र घेऊन देवेंद्र फडणवीस राज्य चालवीत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजितदादा पवार यांनी शरद पवार यांच्याशी राजकीय नाते तोडून स्वतंत्र वेगळे झाले आणि त्याद्वारे निवडणूक लढवून ते महाराष्ट्राच्या सत्तेमध्ये सहभागी होते. त्यांच्या अनपेक्षित आणि अकाली निधनाने तमाम कार्यकर्त्यांना बसलेला धक्का हा एवढा मोठा आहे की, त्यातून कार्यकर्ते किंवा पक्ष एवढ्या लवकर बाहेर पडणार नाहीत. माणसाला कधी ना कधी जावे लागणार, हे निश्चित परंतु अजितदादा पवारसारखी नेतेमंडळी अकाली एक्झिट घेतात हे एखाद्या राजकीय पक्षाला किंवा राजकारणाला देखील न परवडण्यासारखे असते. याचे कारण एक राजकीय नेता परिपक्व तयार होण्यासाठी किमान ५० वर्षे लागतात आणि असे नेते काही वर्षे जगतात, अनेकांना मार्गदर्शन करतात, अनेकांसाठी आधार बनतात आणि अनेक स्तुत्य उपक्रम राबवितात. विकासकामांमध्ये त्यांचा हात कोणी धरू शकत नाही. त्यामुळे अशी मंडळी जाणे हे सर्वार्थाने फार नुकसान ठरते. राष्ट्रवादीचे देखील अतोनात नुकसान झालेले आहे. स्पष्ट सांगायचे झाल्यास या पक्षात कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. एवढा मोठा नेता, ज्याने खुद्द आपल्या काकाला आव्हान देऊन एक वेगळा गट स्थापन केला आणि 'राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार' असे त्याचे नामकरण केले. पक्ष भाजपबरोबर सत्तेत सामील झाला आणि त्या पक्षाचे नेतृत्व करताना अजितदादा पवार हे उपमुख्यमंत्री देखील बनले. आता त्यांच्या जाण्याने पक्षाचे जे नुकसान झालेले आहे, त्याचे शब्दात वर्णन करता येणार नाही परंतु त्यांच्या जाण्यानंतर आता पुढे काय, हा प्रश्न जसा त्या पक्षातील नेत्यांना सतावीत आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सत्तास्थानी असलेल्या सर्वच पक्षांना सतावित आहे. आता एका पाठोपाठ एक प्रतिक्रिया येऊ लागतील. वस्तुत: तशी सुरुवातही झालेली आहे. दादांची पत्नी सुनेत्रा पवार यांच्या हातात बरेच काही आहे परंतु त्यांना जो धक्का बसलेला आहे, त्यातून त्यांना सावरण्यास काही दिवस जातील. राष्ट्रवादीचे जे काही आमदार अजित पवार यांच्या गटामध्ये होते, त्यांच्यासमोर फार मोठा प्रसंग सध्या निर्माण झालेला आहे. 'टू बी ऑर नॉट टू बी', असाही एक प्रसंग आहे. पुढचे पाऊल नेमके काय उचलावे, याबाबत अजित पवार गटातील आमदारांमध्ये चलबिचल आहे. सुनेत्रा पवार यांच्याकडे या पक्षाचे नेतृत्व जाईल काय किंवा त्या आपले दोन पुत्र पार्थ व जय यापैकी एका मुलाचे नाव नेतृत्वासाठी पाठवतील काय? हे करीत असताना अजित पवार यांनी अलीकडेच महापालिका निवडणुकीच्या दरम्यान त्याचबरोबर सध्या चालू असलेल्या जिल्हा पंचायत निवडणुकीच्या दरम्यान शरद पवार गटाकडे पुन्हा हातमिळवणी करण्याच्या उद्देशाने जी पावले उचलली, ते पाहता महाराष्ट्रात नेमके काय होणार! हा प्रश्नदेखील सर्वांनाच पडला होता आणि अजित दादांच्या निधनानंतर तो अनुत्तरीत राहिला. दादा हे तसे बिनधास्त व्यक्तिमत्त्व. त्यांचा स्वभावही तसाच. 'पोटात एक आणि ओठात एक', असे कधी त्यांच्या हिशोबी नव्हते. एका नेत्याच्या निधनानंतर किती नवे प्रश्न निर्माण होतात, याकडे आपल्याला बारकाईने पाहण्याची आज गरज आहे. नेतेमंडळी नेहमीच टीकेचे धनी बनतात परंतु एक नेता काय करू शकतो, याचे दादा हे एक ज्वलंत उदाहरण होते. त्यांच्या निधनानंतर मात्र राष्ट्रवादीचे भवितव्य काय? हा प्रश्न आता निर्माण झाला आहे. शरद पवार यांच्या गटाबरोबर अजितदादांचा गट जर गेला तर त्यांना सत्तेपासून चार हात दूरच राहावे लागेल. 'उबाठा'बरोबर आघाडी करून फारसे काही साध्य होणार नाही आणि हातात आलेली सत्ता गमावून बसण्याची वेळ पक्षाच्या अनेक नेत्यांवर येऊ शकते. जर शरद पवार यांच्याबरोबर जायचे असेल तर शरद पवार यांची कन्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली काम करावे लागेल आणि एवढे असून मंत्रिपद जातील, महामंडळे जातील आणि विरोधी पक्षात बसावे लागेल मात्र थेट भाजपमध्ये प्रवेश केला तर मंत्रिपदाबरोबरच अन्य काही पदांचा लाभही होऊ शकतो. त्यातून आपल्या मतदारसंघाचा विकास करता येईल. अनेक नागरिकांची कामे करण्याची देखील नामी संधी प्राप्त होऊ शकते. अजित पवार यांनी भाजपकडे युती केली होती. ते पक्षात सामील झाले नव्हते आणि आता पवार यांच्या निधनानंतर जर भाजपमध्ये प्रवेश केला तर स्वत:चा प्रश्न सुटणार, हे निश्चित परंतु अजित पवार यांच्याशी गद्दारी केल्याचे लोक बोलतील. यामुळेच अनेक आमदारांसमोर गंभीर पेच प्रसंग निर्माण झालेला आहे. अजितदादा गटाकडे छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेलसारखी अनेक नेतेमंडळी आहेत मात्र अजित पवारांची जागा, ते निश्चितच घेऊ शकत नाहीत. राष्ट्रवादी अजित पवार गटासमोर निर्माण झालेला हा एक प्रसंग आहे. आता दुसरी बाजू सरकारची पाहिली तर भारतीय जनता पक्षाला इतर पक्षातील आमदारांना घेण्याची ही एक सुवर्णसंधी आहे. त्यामुळे भाजपचे संख्याबळ अजूनही वाढत जाईल. त्यातून शिवसेना अडचणीत येऊ शकते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी देखील कसोटीची हीच वेळ आहे. एका नेत्याच्या निधनानंतर किती समस्या निर्माण होऊ शकतात, याचा विचार आपण कधी करीत नसतो. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीसमोर निर्माण झालेला प्रसंग, त्यातून सहीसलामत बाहेर कसे यायचे, हा यक्षप्रश्न राष्ट्रवादीच्या आमदारांसमोर निर्माण झालेला आहे. राष्ट्रवादी पक्षामध्ये अजितदादा गटामध्ये फूट पडून, त्यातला मोठा गट जर भाजपमध्ये विलीन झाला तर उर्वरित आमदारांना देखील मोठा फटका बसू शकतो. यासाठीच महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार यांच्या निधनानंतर एक गंभीर पेचप्रसंग जो निर्माण झालेला आहे, त्यावर तोडगा शरद पवार काढू शकतात मात्र आपल्या कन्येचे हित त्यांनी पाहिले आणि सर्वांना एकत्र केले तर कदाचित सुनेत्रा पवार यांच्यावरही तो अन्याय ठरू शकतो. दादांच्या निधनाने एक राजकीय गंभीर समस्या महाराष्ट्रात जी निर्माण झालेली आहे, त्यावर मुख्यमंत्री फडणवीस नेमका कोणता उतारा काढतात, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# झोपताना 'या' चुका टाळा-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

**निरोगी आरोग्यासाठी चांगली झोप आवश्यक आहे. पण अनेकदा आपल्याकडून कळत-नकळत काही चुका होतात. ज्यामुळे केवळ झोपेचे खोबरे होत नाही तर आरोग्यासही हानी पोहोचते. झोपताना कोणत्या चुका होतात त्याविषयी जाणून घेऊया.**

१) पोटावर झोपणे : काही लोकांना पोटावर झोपण्याची सवय असते; पण ही पद्धत योग्य मानली जात नाही. तज्ज्ञांच्या मते, पोटावर झोपल्याने श्‍वसनलिकेवर दाब येतो. ज्यामुळे श्वासोच्छवासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात. शरीराला योग्य प्रमाणात ऑक्सिजनचा पुरवठा होत नाही. त्यामुळे पोटावर झोपणे टाळावे. डाव्या कुशीवर झोपणे सर्वांत चांगले मानले जाते. यामुळे श्‍वसन आणि हृदयावर कमी दाब पडतो, झोपही चांगली लागते. २) वारंवार झोपेच्या गोळ्या घेणे : झोपेची समस्या निर्माण झाली की, अनेक लोक स्वतःहून औषधे घेण्यास सुरुवात करतात. ही सवय अतिशय चुकीची आहे. अशा प्रकारची औषधे श्‍वसन प्रणालीवर परिणाम करू शकतात. चुकीच्या वापरामुळे इतरही गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात. त्यामुळे कधीही स्वतःहून झोपेची औषधे घेऊ नये. गरज असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ३) पचनास जड खाद्यपदार्थ, उशिरा जेवण : रात्री उशिरा जेवणे तसेच आहारामध्ये पचनास जड खाद्यपदार्थांचा समावेश करणे, यामुळेही झोपेवर परिणाम होतो. जड खाद्यपदार्थांमुळे शरीराला अन्न पचवण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते.



ज्याचा परिणाम झोपेवर होतो. पचन नीट न झाल्यास गाढ झोप लागत नाही. त्यामुळे पचनास हलक्या स्वरूपाचे जेवण करण्याचा प्रयत्न करावा आणि झोपण्याच्या दोन-तीन तास आधीच जेवण करावे. ४) डोक्याजवळ मोबाइल ठेवून झोपणे : हल्ली बहुतांश लोक मोबाइल पाहता पाहता झोपतात किंवा उशीजवळच फोन ठेवून झोपतात. ही सवयदेखील खूप हानिकारक ठरू शकते. डोक्याजवळ फोन ठेवून झोपल्याने रेडिएशन आणि निळ्या प्रकाशामुळे झोपमोड होऊन तणावही वाढू शकतो. तसेच सतत येणाऱ्या नोटिफिकेशनमुळे गाढ झोप लागत नाही. त्यामुळे मोबाइल नेहमी दूर ठेवून झोपावे आणि शक्य असल्यास सायलेंट मोडवर ठेवावा. ५) टीव्ही सुरू ठेवून झोपणे : काही लोक रात्री टीव्ही पाहत झोपतात आणि अनेकदा टीव्ही सुरूच राहतो. या सवयीमुळेही झोपेवर वाईट परिणाम होतात. स्क्रीनचा प्रकाश आणि आवाजामुळे मेंदूला पूर्णपणे आराम मिळत नाही. याचा हृदयाचे ठोके, श्‍वसन प्रणाली आणि झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. त्यामुळे झोपण्यापूर्वी टीव्ही नेहमी बंद करा आणि खोलीत शांतता तसेच पूर्ण अंधार ठेवा असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# बनावट कागदपत्रांद्वारे भूखंड बळकावण्याचा गंभीर प्रकार बीड येथील प्रकरण

बीड । प्रतिनिधी

**बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड व खोट्या व्यक्ती उभ्या करून भू-माफियांकडून जमीन बळकावण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.**

तक्रारदार शेख अकबर शेख दगडुभाई (वय ४२, व्यवसाय वाहतूक निरीक्षक, सध्या खासगी नोकरी, रा. रोशनपुरा बालेपीर, नगर रोड, बीड) यांनी दिलेल्या माहितीनुसार, मौजे तळेगाव ता. जि. बीड येथील सर्व्हे नं. १७४ मधील प्लॉट नं. २५ हा भूखंड त्यांच्या वडिलांच्या नावावर असून तो कायदेशीररीत्या सांग २००१ साली खरेदी केलेला आहे. सदर मालमत्ता ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक ४७३० असून आजही तक्रारदाराच्या कायदेशीर मालकी व प्रत्यक्ष ताब्यात आहे. असे असतानाही काही संघटित भू-माफियांनी पूर्वनियोजित कट रचून तक्रारदाराच्या वडिलांच्या नावाचे बनावट कागदपत्र तयार केले. बनावट आधार व पॅन कार्डच्या आधारे खोटी व्यक्ती उभी करून दिनांक १६/०९/२०२५ रोजी सदर भूखंडाबाबत इसारपावतीचा व्यवहार करण्यात आला. तक्रारदाराने उपनिबंधक कार्यालय, बीड येथे दिनांक ०५/१२/२०२५ रोजी लेखी तक्रार दिली होती. त्यानंतर दिनांक १५/१२/२०२५ रोजी जिल्हा सहनिबंधक यांच्यामार्फत चौकशीचे आदेश देण्यात आले. मात्र दिनांक २८/०१/२०२६ रोजी ऑनलाईन ७/१२ उतारा तपासला असता, मूळ मालकाचे नाव बेकायदेशीररीत्या काढून इतर व्यक्तीचे नाव चढविण्यात आल्याचे निदर्शनास आले. पुढील तपासात दिनांक २६/१२/२०२५ रोजी बनावट कागदपत्रांच्या आधारे सह दुय्यम निबंधक क्रमांक १ यांना हाताशी धरून खरेदीखत नोंद झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणात विक्रम आंबरीश काटे, शेख दगडू शेख मोहिद्दीन यांच्या नावाने बनावट कागदपत्र तयार करणारी व्यक्ती शेख इसुब शेख शब्बीर रा. तेलगाव नका बीड , सुनील प्रल्हाद सरडे, सचिन गुलाब शिवगण तसेच इतर अज्ञात व्यक्ती सहभागी असल्याचा आरोप आहे. सदर प्रकरणात भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० (फसवणूक), ४६७, ४६८, ४७१ (बनावट दस्तऐवज), ४०६ (विश्वासघात) व १२०-ब (गुन्हेगारी कट) अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित भू-माफियांवर कठोर कारवाई करून तक्रारदाराला न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# परळीत लॉज मधे चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर छापा

परळी । प्रतिनिधी

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (एएचटीयू) व पोलीस ठाणे परळी ग्रामीण ची संयुक्त कारवाई दोन पिडीत महिलांची सुटका, अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव व परळी ग्रामीणचे सहायक पोलीस निरीक्षक सदानंद मेंडके यांना दिनांक २९/०१/२०२६ रोजी दुपारी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की , पोलीस ठाणे परळी ग्रामीण हद्दीत साई लॉज टोकवाडी, परळी बीड रोड येथे बाहेर जिल्ह्यातून महिलांना बोलावून, वेश्या व्यवसाय करीत आहेत. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी पोलीस निरीक्षक मझहरअली सय्यद प्रभारी पोलीस ठाणे परळी ग्रामीण यांना (एएचटीयू) टीम सोबत सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून पोस्टे परळी ग्रामीण चे पीआय मझहरअली सय्यद, एपीआय सदानंद मेंडके स्टाफसह व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख पीएसआयपल्लवी जाधव या त्यांच्या संपूर्ण स्टाफसह तसेच डमी ग्राहक व दोन शासकीय पंचासह सापळापूर्व पंचनामा करून सदर ठिकाणी गेले. डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी १५०० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास ठरलेला इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या पुरुषाला त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव नाशर नशीर शेख असे सांगितले. सदर पुरुषाची पंचासमक्ष झडती घेतली असता, डमी ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या ३ नोटा मिळून आल्याने त्या पंचासमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी दोन पीडित महिला मिळून आल्या . त्यापैकी डमी ग्राहकासोबत रूम मधे मिळून आलेल्या पीडीत महिलेला विश्वासात घेवून चौकशी केली असता , तीने सांगितले की, ती भिवंडी ठाणे ची असून दत्ता अंतराम मुंडे याने मला फोन करून इथे बोलवून घेतले आहे. तसेच दुसरी महिला पुणे येथून आली आहे. प्रत्येक ग्राहकाकडून १५०० रू घेतात व त्यापैकी आम्हाला ५०० रु देतात.




एजंट नाशर नशीर शेख व मॅनेजर सोमनाथ ज्ञानोबा मुंडे रा. टोकवाडी तसेच दत्ता अन्तराम मुंडे रा. कन्हेरवाडी ता. परळी जि बीड पीडीत महिलांना बोलवून घेतात व स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. तसेच रुमची झडती घेतली असता ६ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे. नमुद आरोपी , पीडीत महिलेस स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बोलावून घेऊन, स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ ,प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे अंबाजोगाई उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मझहरअली सय्यद , सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद मेंडके पोठा परळी ग्रामीण, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव, अंकुश निमोने, महीला पोलीस हवालदार उषा चौरे, पोलीस हवालदार अशोक शिंदे, राजेंद्र मिसाळ, नवनाथ हारगावकर, रमेश तोटेवाड, तुळशीराम परतवाड, रावसाहेब मुंडे, विठ्ठल परजणे, पोलीस शिपाई योगेश निर्धार, महादेव केदार, सर्व नेमणूक पोठा परळी ग्रामीण व अ. मा. वा. प्र. कक्ष यांनी केली.

## पान १ वरून...

### सोयाबीनची आवक

आणि मागणी कमी असल्यामुळे पांढऱ्या सोयाबीनच्या दरांवर दबाव जाणवत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना संपूर्ण माल एकाचवेळी विकण्याऐवजी टप्प्याटप्प्याने विक्री करण्याचा सल्ला दिला आहे. साठवणूक खर्च, दर्जा घसरण आणि बाजारातील अचानक बदल लक्षात घेऊनच निर्णय घ्यावा, असेही असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

----------------

### अजित पवारांच्या शब्दपूर्तीसाठी

नदीच्या प्रदूषणाची प्रत्यक्ष पाहणी केली. नीरा नदीच्या प्रदूषणाबाबत अजित पवार यांनी ह्यात असताना गांभीर्याने लक्ष घातले होते. खाजगी कारखान्यांतून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक पाण्यामुळे नीरा नदीचे पाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झाले होते. काही दिवसांपूर्वी या प्रदूषणामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर मासे मृत्युमुखी पडल्याची घटना घडली होती.या घटनेमुळे नदीकाठच्या नागरिकांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती. शेतकऱ्यांनी हा गंभीर प्रकार थेट उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शरद पवार यांच्या कानावर घातला होता. यावेळी अजित पवार यांनी शेतकऱ्यांना नीरा नदी प्रदूषणमुक्त करण्याचे ठाम आश्वासन दिले होते.अजित पवार यांच्या निधनानंतर ''आता या प्रश्नाकडे कोण लक्ष देणार?'' असा प्रश्न उपस्थित होत असतानाच, शरद पवार यांनी आज स्वतः नीरा नदीच्या प्रदूषणाची पाहणी करत अजित पवारांचा शब्द पूर्ण करण्याचा निर्धार दाखवला आहे. पाहणीदरम्यान शरद पवार यांनी नीरा नदीकाठच्या नागरिकांशी आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. शेतकऱ्यांच्या समस्या, प्रदूषणामुळे शेतीवर होणारे परिणाम, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न याबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली.या पाहणीदरम्यान शरद पवार यांनी संबंधित यंत्रणांना प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या खाजगी कारखान्यांची चौकशी करून कडक कारवाईचे संकेत दिल्याची चर्चा आहे. नीरा नदीचे पाणी शुद्ध करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवण्यात येतील, असा विश्वासही त्यांनी नागरिकांना दिला.

------------------

### तर आजच सुनेत्राताईंचा

घरातून बाहेर पडतात. ही बाब लक्षात घेता पुढील निर्णय होईल. याबद्दलचं चित्र तास-दोन तासात स्पष्ट होईल, अशी माहिती भुजबळ यांनी दिली.'आम्ही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटलो. त्यावेळी प्रफुल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडे उपस्थित होते. आजही आम्ही मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेदी निवड व्हावी यासाठी पक्षातील नेते, आमदार आग्रही आहेत. आम्ही ही बाब उद्याच्या बैठकीत सुनेत्रा वहिनींच्या कानावर घालू. त्यांचं मत जाणून घेऊ. शक्य झाल्यास उद्याच त्यांचा शपथविधी होईल. या सगळ्यामध्ये प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे लक्ष घालत आहेत,' असं भुजबळ यांनी सांगितलं.अजित पवार यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेसचं राष्ट्रीय अध्यक्षपद होतं. तेच पक्षाचे विधिमंडळ गटनेते होते. मग या दोन्ही पदांवर सुनेत्रा पवार यांचीच वर्णी लागणार का, असा प्रश्न भुजबळ यांना विचारण्यात आला. त्यावर विधिमंडळ गटनेता निवडण्याला आमचं प्राधान्य आहे. त्यासाठी उद्याच बैठक घेतली जाईल. या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब होऊ शकतं, असं भुजबळ म्हणाले. याबद्दलचं चित्र तासा-दोन तासात स्पष्ट होईल, अशी माहिती भुजबळ यांनी दिली.

------------------

### सुप्रीम कोर्टाने शाळा व्यवस्थापनाला

योग्य काळजी मिळाली नाही तर त्यांची प्रतिष्ठा आणि गोपनीयता धोक्यात येते.हा आदेश केवळ कायदेशीर व्यवस्थेत सामील असलेल्यांसाठी नाही. हा आदेश अशा वर्गखोल्यांसाठी देखील आहे जिथे मुली मदत घेण्यास कचरतात. हे अशा शिक्षकांसाठी देखील आहे जे मदत करू इच्छितात परंतु संसाधनांच्या कमतरतेमुळे अडचणीत आहेत. हे अशा पालकांसाठी देखील आहे ज्यांना त्यांच्या मौनाचा परिणाम समजत नाही. हे समाजासाठी देखील आहे, जेणेकरून प्रगतीचे मोजमाप आपण आपल्या सर्वात असुरक्षित मुलांचे किती चांगले संरक्षण करतो यावरून होते. आम्हाला हा संदेश प्रत्येक मुलीला द्यायचा आहे जी शाळेत अनुपस्थित राहिली आहे कारण तिचे शरीर ओझे मानले जात होते, जरी ती तिची चूक नव्हती. सामाजिक कार्यकर्त्या जया ठाकूर यांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आणि मुलींच्या आरोग्याबद्दल चिंता व्यक्त केली.

----------------

### अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास

येथील सेक्टर १६ भूखंड क्रमांक आठ मधील एकूण क्षेत्र सहा हजार चौरस मीटर चा भूखंड हेच विशेष बाब म्हणून एक रुपया प्रति चौरस मीटर या नाममात्र दराने चटई क्षेत्र निर्देशांकासह राज्य शासनाच्या नियोजन विभागास वाटप करण्यात येत आहे नियोजन विभागाने सिडको महामंडळाशी समन्वय साधून विहित कारवाई करावी सिडको महामंडळाने मुक्त क्षेत्र राज्य शासनाच्या नियोजन विभागास हस्तांतर बाबतची कारवाई तातडीने करण्याचे आदेश देखील यामध्ये दिलेले आहेत राज्यात माहितीचे सरकार आणि त्यापूर्वी युतीचे सरकार असताना कैलासवासी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ स्थापना करण्यात आली जिल्ह्यामध्ये काही कार्यालय आहेत मात्र या महामंडळाची स्वतंत्र अशी इमारत नव्हती स्वतंत्र इमारत असावी अशी मागणी मराठा समाजासह या महामंडळाचे अध्यक्ष यांनी केली होती अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना कंपनी कायदा अधिनियम १९५६ अंतर्गत शासन निर्णय २०२० नुसार महामंडळाचे संपूर्ण कामगार कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाकडून नियोजन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करणे शेतीपूरक व्यवसाय लघुउद्योग वाहतूक प्रक्रिया विपणन पुरवठा व साठवणूक यासाठी अर्थसहाय्य करणे सुशिक्षित बेरोजगार युवकांना आर्थिक स्थर उंचावण्यासाठी उद्योग व व्यावसायिक क्षेत्रात मराठा समाजाचा सहभाग वाढवणे ही अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची उद्दिष्ट आहेत या महामंडळा अंतर्गत लाभार्थ्यांना व्याज परतावा देणे त्याचबरोबर सद्यस्थितीत नवीन उद्देशानुसार महामंडळाच्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात येत होते प्रामुख्याने या महामंडळाची स्वतंत्र अशी इमारत किंवा कार्यालय नसल्याने या कार्यालयाची मागणी होत होती मुंबई मुंबई उपनगर आधी भागामध्ये काही इमारती ब्रिटिशकालीन आहेत परंतु येथे मुख्यालय स्थापन करणे खर्चिक बाब असल्याने हा भूखंड पनवेल या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला आहे लवकरच या ठिकाणी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची टोलेजंग इमारत उभी राहणार आहे.

--------------

### भूसंपादन लवादातील २४१ कोटींच्या

जिल्हाधिकाऱ्यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी वापरून दिनांक १ मार्च २०२५ ते १७ एप्रिल २०२५ या कालावधीत तब्बल १५४ बनावट लवाद आदेश निर्गमित झाल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले. या आदेशांच्या कव्हरिंग लेटरवर १७ एप्रिल २०२५ तारीख नमूद असतानाही, संबंधित आदेश जायकवाडी प्रकल्प भूसंपादन कार्यालय व उपविभागीय अधिकारी, बीड कार्यालयास १ ते ५ महिन्यांनंतर प्राप्त झाल्याचे उघड झाले आहे. या १५४ प्रकरणांच्या आधारे अंदाजे रु. २४१ कोटी ६२ लाख इतक्या वाढीव मोबदल्यास मंजुरी देण्यात आल्याचा आरोप आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ अंतर्गत छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडून सुमारे रु. ७३ कोटी निधी प्राप्त करून त्याचे वितरण करण्यात आले असून, या रकमेच्या अपहाराचा गंभीर संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात संजय हांगे (सहाय्यक महसूल अधिकारी), अविनाश चव्हाण, शेख अजहर शेख बाबू, त्रिंबक पिंगळे (सेवानिवृत्त), पांडुरंग पाटील (सहाय्यक महसूल अधिकारी), राष्ट्रीय महामार्ग कार्यालयातील अधिकारी तसेच काही वकिलांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती समोर आली आहे. विशेष बाब म्हणजे, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी मा. अप्पर जिल्हाधिकारी श्री. हरीश धार्मिक यांच्या अध्यक्षतेखाली पूर्ण झाली असून, त्या चौकशी अहवालाच्या आधारेच गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र, आता हाच अधिकृत चौकशी अहवाल प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. याबाबत माहिती मागितली असता, अभिलेख कक्ष ''फाईल अद्याप जमा झालेली नाही'', जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक : ''अहवाल अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे आहे'', अप्पर जिल्हाधिकारी : ''अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला आहे'' अशी परस्परविरोधी उत्तरे मिळाल्याने जाणीवपूर्वक अहवाल दडपण्याचा व पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय बळावला आहे. सरवदे यांनी ७ दिवसांत चौकशी अहवालाची छायांकित प्रत उपलब्ध करून देण्याची मागणी केली असून, अन्यथा विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच उच्चस्तरीय यंत्रणांकडे तक्रार सादर करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, २४१ कोटींच्या कथित घोटाळ्याच्या चौकशी अहवालाचे नेमके काय झाले? हा प्रश्न सध्या संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत असून, प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**तत्कालीन जिल्हाधिकारी यांना वाचवण्याचे षडयंत्र-अजय सरवदे**

''चौकशी समितीचा अहवाल हा कोणाचाही वैयक्तिक दस्तऐवज नसून तो शासकीय अभिलेख आहे. अहवालावर आधारित गुन्हे दाखल झाले असताना तो लपविला जात असेल, तर हा प्रकार अत्यंत गंभीर असून प्रशासनाची भूमिका संशयास्पद आहे.'' या प्रकरणांमध्ये मुख्य आरोपी तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक हेच आहेत त्यांच्या स्वाक्षऱ्या पुणे व नागपूर या ठिकाणी पाठवून पडताळणी करून घ्यावी आणि त्यांना मुख्य आरोपी घोषित करावी यासाठी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने पाठपुरावा सुरू आहे.

-------------

### सत्ता मिळवण्यासाठी राज्याचे

महाराष्ट्र महसुली तुटीत गेला. तसेच महिला कामगारांच्या श्रमशक्तीतील सहभागावर नकारात्मक परिणाम झाल्याचेही २९ जानेवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार झालेल्या निरीक्षणात नोंदविण्यात आले आहे. यावर आता विरोधी पक्षानेही सरकारवर जोरदार टीका केली आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण यासारख्या लोकानुनयी योजना आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे राज्य सरकारच्या जमा-खर्चाचे गणित बिघडल्याने त्याचा फटका चालू आर्थिक वर्षातील तरतुदींना बसला आहे निवडणुकीच्या तोंडावर हे सगळे निर्णय होतात आणि निवडणूक जिंकल्या जातात यावेळी निवडणूक आयोग काय करते असा सवालही त्यांनी केला आहे. निवडणूक आयोगाने कठोर भूमिका घेतली पाहिजे पण ते कठोर भूमिका घेऊ शकत नाहीत. ते सरकारच्या हातामधील खेळणे झाले आहेत.

----------------

### मद्यपान करणाऱ्या एसटी

आदेश मुख्यालयाकडून जारी करण्यात आले आहेत. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी २५ जानेवारीला परळ बसस्थानकाला अचानक भेट दिल्यानंतर ही कारवाईची चक्रे वेगाने फिरली. या भेटीदरम्यान चालक-वाहक विश्रांतीगृहांमध्ये मद्याच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्या. तसेच काही कर्मचा-यांनी कर्तव्यावर जाण्यापूर्वी मद्यपान केल्याचेही निदर्शनास आले.प्रवासी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत ही मोहीम अधिक काटेकोरपणे राबवली जाणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या यंत्र अभियंता (चालन) विभागामार्फत सर्व विभाग नियंत्रक, विभागीय कार्यशाळा आणि संबंधित अधिका-यांना परिपत्रक पाठवून या सूचनांची माहिती देण्यात आली आहे. कर्तव्यावर जाण्यापूर्वी चालकाने मद्यपान केले नसल्याची खात्री करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे.परिपत्रकानुसार, कर्तव्यावर जाणा-या प्रत्येक चालकाची मद्यपानाबाबत खात्री करूनच त्याला ड्युटीवर पाठवावे, ज्या वाहनावर चालकाची नेमणूक आहे, त्या वाहनासोबतच त्याची ब्रेथ ॲनालायझर चाचणी घ्यावी, वाहन परीक्षकांनी चालकाची तपासणी न करता कोणतेही वाहन बाहेर जाऊ देऊ नये, मद्यपान केल्याचे आढळल्यास संबंधित चालकाला तत्काळ कर्तव्यातून दूर ठेवून आगार व्यवस्थापकांना माहिती द्यावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

------------------

### सर्वसामान्यांचा ताण मिटणार

रकमेची आवश्यकता आहे. या नवीन एटीएम मशीनमधून १०० आणि ५०० च्या नोटा तसेच १०, २० आणि ५० च्या छोट्या नोटा मिळतील.सरकार अशा मशीन बसवण्याची योजना आखत आहे जिथे लोक त्यांच्या १०० किंवा ५०० च्या नोटा देऊन त्याबदल्यात १०, २० किंवा ५० च्या नोटाही घेऊ शकतात. वाढत्या यूपीआयच्या या युगातही, लहान दुकानदार, प्रवासी, रस्त्यावरील विक्रेते आणि रोजंदारी कामगारांसह अनेक लोक अजूनही दैनंदिन व्यवहारांसाठी रोख रक्कम वापरतात. सध्या, मुंबईत याचसाठी एटीएम मशीनची चाचणी घेतली जात आहे. यशस्वी आणि मंजूर झाल्यास ते देशभरात लागू केले जातील.म्हणजेच आता सुट्टे देणारी एटीएम मशीन अनेक बाजारात दुकानाच्या शेजारी दिसतील.

-------------

# माजलगाव लाच प्रकरणात एसपींकडून दुसरा दणका



## पीएसआय पवन निंबाळकर नियंत्रण कक्षात

**माजलगाव । प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांचा दबदबा कमी झाल्याच्या चर्चा सुरू असतांनाच माजलगावच्या लाच प्रकरणात प्रभारी अधिकाऱ्याला तातडीने नियंत्रण कक्षात सलग्न करत एसपींनी आपल्या कर्तव्यकठोर भुमिकेची आठवण करून दिली होती. आता या आणखी एक भर पडली असून पवन निंबाळकर या पीएसआयला देखील लाच प्रकरणाचा ठपका ठेवून नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. नवनीत कॉवत यांनी दोन दिवसात दोन अधिकाऱ्यांना दिलेले दणके जिल्हा पोलीस दलात चर्चेचा विषय ठरत आहेत.

माजलगावात वाळू वाहतूक सुरळीत राहण्यासाठी २० हजाराच्या लाचेची मागणी करण्यात आली होती. शहर पोलीस ठाण्यातील कर्मचारी अमोल कदम याने ही मागणी तक्रारदाराकडे केल्यानंतर जालन्याच्या लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे याची तक्रार देण्यात आली. त्यानुसार जालन्याच्या लाचलूचपत प्रतिबंधक पथकाचे उपअधिक्षक बाळासाहेब जाधव यांच्या पथकाने बुधवारी माजलगाव बायपास रोडवरील लेंडाळ हॉस्पिटलसमोर सापळा रचला, यावेळी कदम यांच्या खाजगी व्यक्ती असलेल्या तात्यासाहेब आर्डे याने सदर रक्कम स्विकारताच त्याला रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले. दरम्यान या प्रकरणात अमोल कदम आणि तात्यासाहेब आर्डेवर गुन्हा दाखल झाल्यानंतर सायंकाळच्या सुमारास माजलगावचे प्रभारी असलेल्या राहूल सुर्यतळ यांना नियंत्रण कक्षात सलग्न करण्यात आले. त्यांच्या ठिकाणी बीडच्या होम डिवायएसपीचा पदभार असलेल्या उमाशंकर कस्तुरे यांना माजलगाव येथे पाठविण्यात आले होते. दरम्यान गुरुवारी अमोल कदमला निलंबीत करण्यात आले असून या प्रकरणातील दोषी असलेल्या पीएसआय पवन निंबाळकरलाही एसपींनी दणका दिला आहे. त्याचीही नियंत्रण कक्षात बदली करण्यात आल्याने एसपींच्या या दणक्यांच्या चर्चा पोलीस दलात पुन्हा सुरू झाल्या आहेत.

## थोडक्यात



### दीप इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील नित्रुड येथील दीप इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन मंगळवारी उत्साहात संपन्न झाले. छोट्या छोट्या चिमुकल्यांनी बहारदार नृत्य सादर करत ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा आता कमी नाहीत असे याप्रसंगी दाखवून दिले. या लहान लहान बालकांनी तब्बल अडीच तास प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

राजमाता जिजाऊ माँसाहेब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दिनेश गायकवाड, दत्ता डाके, उध्दव बोरचाटे, बंडू खांडेकर, माजी सैनिक धनंजय राऊत, उध्दव केकान,पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे,नवनाथ कांबळे यांची प्रमुख उपस्थिती याप्रसंगी होती. संस्थेच्या अध्यक्ष संजीवनी राऊत यांनी आपल्या प्रस्ताविकात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व कलाक्षेत्रातील गुण जोपासण्यासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन केल्याचे सांगितले. सामाजिक, सांस्कृतिक व आधुनिक ४३ गीतांवर बाल विद्यार्थ्यांनी झुंबड नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. मुख्याध्यापक नवनाथ चव्हाण,सादिया तांबोळी यांनी बहारदार सूत्रसंचालन केले तर प्रतीक राऊत यांनी आभार मानले. या बालकांच्या कलाविष्कारांचे उपस्थित त्यांनी तोंड भरून कौतुक केले.

### शासकीय रेखाकाला परीक्षेत संत खंडुजी बाबा विद्यालय सैदापुर शाळेचा १०० टक्के निकाल

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाच्या वतीने २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इलेमेंटरी व इंटरमिजिएट शासकीय रेखाकला परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून दिगंबर महाराज कृषी व ग्रामीण विकास संस्था संचलित संत खंडूजी बाबा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या दोन्ही परीक्षांमध्ये विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला आहे इलेमेंटरी परीक्षेत १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कु.कापरे आदिती कु.दडपे नम्रता कु.कोळेकर ज्ञानेश्वरी कु.काळे शितल कु.दातखिळ विशाखा कु.दातखिळ प्रतीक्षा कु.यमगर प्रणाली चि.कोळेकर सुरज चि.कोळेकर बालाजी चि.बाचकर संतोष चि.कोळेकर गोरख चि.देशमुख सुरज चि.वाघमोडे प्रथमेश यांनी यश संपादन केले. इंटरमिजिएट परीक्षेत ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत कु.डोंगरे आरती कु.कापरे तनुजा कु.राऊत प्रगती कु.राऊत भाग्यश्री चि.नागटिळक युवराज या विद्यार्थ्यांनी यशस्वी कामगिरी केली या सर्व विद्यार्थ्यांना श्री.राऊत के.पी व श्रीमती.पांचाळ मॅडम या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे सचिव श्री. बाळासाहेब सुतार सर व शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती.भालेकर मॅडम तसेच सखी सावित्री समिती अध्यक्षा श्रीमती.रूपाली दडपे व पालक वर्ग यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

### फुस लावुन पळवुन नेल्याच्या आरोपातुन आरोपीची निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**

शिवाजी नगर पोलीस स्टेशन, बीड ता. जि. बीड येथे दाखल झालेला गुन्हा क्र. १६६/२०२४ नुसार भा.द.वि. चे कलम ३६३ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास करून अंतिम दोषारोप पत्र मा. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, बीड यांचे न्यायालयात दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात सरकारी पक्षातर्फे एकुण तीन साक्षिदार तपासण्यात आले होते. अरोपीच्या वतीने आरोपीची सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यासाठी आरोपीच्या वतीने अॅड. अमर राजेंद्र बावचकर यांनी अभ्यासपुर्ण पुरावे देवुन बाजु मांडत युक्तीवाद केला सदर युक्तीवाद ग्राह्य धरून ९ वे मा. अति. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, बीड यांनी आरोपीची सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने अॅड. अमर राजेंद्र बावचकर यांनी काम पाहिले व त्यांना अॅड, अनुराग ठोसर, अॅड. गोपाल मात्रे, अॅड. अशोक खरात व शेख जावेद यांनी सहकार्य केले.

## महात्मा गांधीजीच्या अहिंसेच्या विचाराची आज समाजाला गरज -प्राचार्य कदम





**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राण अर्पण केलेल्या हुतात्म्याच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशात दोन मिनिटं मौन पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते त्यानुसार यावर्षी शुक्रवारी दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी ठीक अकरा वाजता दोन मिनिट हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात आला या कार्यक्रमाची अध्यक्ष महाविद्यालयाची प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वास कदम प्रमुख पाहुणे डॉ सुनील जाधव प्राध्यापक सोमनाथ घाडगे समन्वयक प्राध्यापक विनोद कीदक महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी महात्मा गांधी यांना विनम्र अभिवादन करून हुतात्मा दिनानिमित्त दोन मिनिटाची हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### आदित्य पॉलीटेक्निकच्या दोन

करताना विभागप्रमुख प्रा गडदे आर.ए., प्रा तांबे एल.टी., प्रा निमगावकर एस.एस., विभागप्रमुख प्रा राऊत डी.एस., प्रा खालापुरीकर जी.एम. उपस्थित होते.

**करिअर घडविण्याचा प्रामाणिक दृष्टिकोन फलदायी भागवत औटे**

आदित्य पॉलीटेक्निकचा विद्यार्थ्यांच्या करिअरला योग्य वळण देण्याचा उद्देश अत्यंत प्रामाणिक आणि सकारात्मक आहे. केवळ शिक्षण देणे नव्हे, तर भविष्याच्या संधी ओळखून त्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करणे हे महाविद्यालयाचे वैशिष्ट्य आहे. याच मार्गदर्शनाचा परिणाम म्हणून माझ्या मुलाची भारतीय सीमा सुरक्षा दलात निवड झाली, असे समाधान व अभिमानाने वडील भागवत औटे यांनी सांगितले.

### मच्छिंद्रनाथ गडाच्या दरीत

पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी पथकासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. दुर्गम भाग असल्याने पोलिसांनी मोठ्या शर्थीने हे मृतदेह बाहेर काढले.ओळख पटली अन्? कुटुंबीयांचा आक्रोश

मयत निलेश नारायण घोंगरे (वय २६, रा. बेलापूर खुर्द, जि. अहिल्यानगर) हा महिनाभरापूर्वी गडावर दर्शनासाठी आला होता, पण तिथूनच तो बेपत्ता झाला होता. त्याच्या घरच्यांनी अंभोरा पोलिसात तक्रारही दिली होती. दरीत सापडलेला सापळा निलेशचाच असल्याची ओळख पटताच त्याच्या कुटुंबीयांनी एकच टाहो फोडला. दुसरा मृतदेह दिनकर नाना घडशिंग (वय ६५, रा. भिलवाडा, पाथर्डी) या वृद्धाचा असल्याचे निष्पन्न झाले.दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले आहेत. हे भाविक भोळसर प्रवृत्तीचे असल्याने किंवा रस्ता चुकल्याने दरीत पडले असावेत, अशी प्राथमिक शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. मात्र, एकाच ठिकाणी दोन मृतदेह वेगवेगळ्या वेळी आढळल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. पोलीस उपनिरीक्षक देवीदास सातव आणि सोपान येवले या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### अकोला गावातील

अकोला गावातील ग्रामपंचायत मधील काही सदस्य आणि गावातील काही नागरिक ग्रामपंचायत सदस्य यांनी सरपंच पदाचा पदभार घेतल्यापासून मला त्रास देत आहे.याचे कारण देत महिला सरपंच राखी अंधारे यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिला आहे. ग्रामसभेत अरेरावीची भाषा कुठलेही विकासकाम सुरू केल्यास पैशाची मागणी सातत्याने होत आहे. ग्रामपंचायत अधिकाऱ्यासह पंचायत समिती मधील प्रशासन मला सहकार्य करीत नाही. गावात विकास कामे करण्याचा मी प्रयत्न करीत असून गावातील काही सदस्य आणि काही ठराविक नागरिक मला विकास काम करू देत नाहीत. विकास कामात अडचण निर्माण करीत आहेत. ग्रामसभेत आणि विकास काम करीत असताना अरेरावीची भाषा गावातील काही नागरिक आणि ग्रामपंचायत सदस्याकडून होत आहे. गावातील त्रासाला कंटाळून ओबीसी सरपंच महिलेने सरपंच पदाचा राजीनामा दिला आहे.

### साठ लाखाचे दागिणे

बळावली असल्याचे कळते आहे.सूत्रांकडून आलेल्या माहितीप्रमाणे,गुन्ह्याच्या वेळ,मार्ग आणि वाहतुकीची अचूक माहिती आरोपींकडे होती.व ती माहिती व्यापाऱ्याच्या नजीकच्या व्यक्तीने पुरविल्या असल्याचे कळते.त्यामुळे हा प्रकार केवळ योगायोग नसून पूर्वनियोजित कट असल्याचा संशय आहे.दरम्यान सदरील रोड रॉबरी कट कारस्थानात 'घर का भेदीच' लंका जाळण्यासाठी निघाल्याचे समोर येत असल्याने या प्रकरणाने सराफा मार्केटला मोठी खळबळ माजली आहे.

### अजितदादांसारखा नेता

घ्यायचे. घोषणा नव्हे, तर काम हेच त्यांचे राजकारण होते.

बुधवारची सकाळ महाराष्ट्राच्या इतिहासातील काळी सकाळ ठरली. विमान दुर्घटनेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राज्याच्या राजकारणातील प्रभावी नेतृत्व असलेले अजितदादा पवार यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला असून सामान्य जनतेचे अश्रू आजही थांबलेले नाहीत.

या श्रद्धांजली सभेत माजी आमदार भीमरावजी धोंडे, साहेबराव दरेकर, बाळासाहेब आजबे सतिश शिदे , सुभाष राऊत, यांनी देखील अजितदादांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला व आपल्याबरोबरचे काही क्षण सांगितले खऱ्या अर्थाने अजितदादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री होते आम्ही अजित दादा सारखा पालक गमावला अशी भावना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी व्यक्त केली तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी दोन मिनिटांचे मौन पाळून दिवंगत नेत्यास श्रद्धांजली अर्पण केली.

### दादा केवळ नेते नव्हे तर

असून ही पोकळी कधीही भरून निघणारी नाही. अशी भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बीड जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी, कार्यकर्ते दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. संदीप क्षीरसागर यांना अश्रू अनावर

राष्ट्रवादी भवन येथे आयोजित अजितदादांच्या श्रद्धांजली सभेत मनोगतासाठी उभे राहातच अजित दादांबद्दल बोलताना आ. संदीप क्षीरसागर यांना गहिवरून आले होते. त्यांचा कंठ दाटून आला होता आणि अश्रू अनावर झाले होते.

## तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजच्या रासेयो शिबिराअंतर्गत आरोग्य तपासणी




बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित सात दिवसीय विशेष शिबिराच्या अंतर्गत तालुक्यातील शिवणी येथे मुलींसाठी अनेमिया (रक्तक्षय) तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरासाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश काकडे व त्यांची आरोग्य टीम उपस्थित होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण तपासण्यात आले. तपासणीदरम्यान रक्तक्षयाची कारणे, लक्षणे, दुष्परिणाम तसेच प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या आरोग्य शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.वृषाली लोखंडे, प्रा.श्वेता वंजारे तसेच सर्व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




## विद्यार्थ्यांनी केला स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रशासकीय,राजकीय अभ्यास

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येतील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रशासकीय व राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी माननीय प्राचार्य डॉ विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे डॉ सुनील जाधव प्राध्यापक विनोद कीदक यांच्या सूचनेनुसार विभागाच्या वतीने पाटोदा नगरपंचायतीतील क्षेत्रीय भेट देण्यात आली यावेळी विद्यार्थ्यांना पाटोदा नगरपंचायत चे नगराध्यक्ष चे पती व सुरेश आण्णाचे सुखीय सहाय्यक सोमनाथरावजी कोल्हे यांनी मार्गदर्शन केले यात शिक्षण आरोग्य पाणीपुरवठा बांधकाम इत्यादी सभापती कार्यालयास भेट देऊन प्रशासन व्यवस्थेचा आढावा घेतला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मार्गदर्शन केले वेगवेगळ्या विभागाची प्रशासकीय माहिती विद्यार्थ्यांना दिली हे क्षेत्रीय भेट यशस्वी करण्यासाठी प्रा डॉ शिवाजीराव काकडे प्राध्यापक पापाजी चव्हाण व प्राध्यापक डॉ नारायण फुने डॉ बी बी लोखंडे प्राध्यापक सोमनाथ घाडगे यांनी सहकार्य केले तनुजा जाधव पायल मुळे रवींद्र सिंग टाक यांनी सहभागी.

## घाटनांदुर कडकडीत बंद ठेवून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण



घाटनांदुर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे दि. २८ जानेवारी रोजी बारामती येथील विमान अपघाताचे दुर्घटनेत निधन झाले.त्यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्रातील कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली असून त्यांच्या निधनामुळे संबंध महाराष्ट्र व देशामध्ये त्यांच्या अपघाती निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. त्याचाच भाग म्हणून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना घाटनांदुर करांच्या वतीने घाटनांदुर कडकडीत बंद ठेवून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना २९ जानेवारी रोजी सायं.५ वा छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी अजित दादा पवार यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून सर्व पक्षाचे नेते मंडळी व गावकऱ्यांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली यावेळी बाळासाहेब देशमुख, महेश गारठे , नरसिंग जाधव,ज्ञानोबा जाधव, दत्ता जाधव, बालासाहेब राजमाने, गणेश देशमुख,दादा वैद्य,सुरेश मिसाळ, राजकमल देशमुख, लहुदास गीते,रामभाऊ वैद्य,उत्सव जाधव, पत्रकार परमेश्वर वैद्य, उत्तम शिंगाडे, प्रदीप वैद्य, महेबूब शेख, महादेव पिंपळे,नागेश शेटे,व सर्व पक्षीय नेते मंडळी , व्यापारी वर्ग,कार्यकर्ते, गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अजितदादांना आंदोलन कट्यावर आंदोलनकर्त्यांकडून श्रद्धांजली

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले. पालकमंत्री म्हणून बीड जिल्ह्याशी त्यांचे अतूट नाते निर्माण झाले होते. बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या मनात त्यांनी विकासाची नवी आशा जागवली होती.**

पालकमंत्री म्हणून त्यांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी रेल्वे, विमानतळ, ट्रिपल आयटी (-), सहकार भवन, जिल्हा क्रीडा संकुल, सिल्क पार्क, रुग्णालयांसाठी नवीन इमारती व अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्ती व बांधकाम, अंगणवाड्यांसाठी निधी, स्मशानभूमी विकास, ग्रामीण रस्त्यांचे मजबुतीकरण व दुरुस्ती, नर्सिंग कॉलेज, वसतिगृहे, फसवणूक झालेल्या ठेवीदारांसाठी मदत, कंकालेश्वर मंदिर, नाट्यगृह आदींसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला होता. त्यांच्या या विकासकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत



आज दि. ३० (शुक्रवार) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनस्थळी आंदोलनकर्ते, माहिती अधिकार कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणप्रेमी आणि अजितदादांवर प्रेम करणाऱ्या बीडकरांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर), माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, रामनाथ खोड, बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भीमशक्ती विचारमंच), माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक), सय्यद सादेक (शहराध्यक्ष आम आदमी पार्टी), प्राचार्य डी. जी. तांदळे (जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य किसान सभा, बीड), राजकुमार कदम (सरचिटणीस मराठवाडा शिक्षक संघ), धनंजय सानप (जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना), संजय भालशंकर, भाई गौतम आगळे (नेते रोजंदारी मजूर सेना), शेतकरी हक्क मोर्चाचे सुहास जायभाये, माईकल अशोक वाघमारे, संभाजी कदम लोणीकर आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अजितदादांनी केलेली विविध विकासकामे बीडकरांच्या मनात कायमस्वरूपी स्मरणात राहतील, असे यावेळी सांगण्यात आले.


Rajya Loktantra 31 Jan-2026


**CHANGE IN NAME**

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME
Old name- Ganesh satish chordiya
new name- Ganesh satishchand chordiya
A/P hanuman road shirur kasar tq shirur kasar dist beed Maharashtra 413249
Mo 9881607127

# कृषी योजनांचा निधी मार्च अखेरपर्यंत खर्च करा

## केंद्रीय कृषिमंत्र्यांचे राज्यांना निर्देश

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज राज्यांच्या कृषी मंत्र्यांसोबत एक महत्त्वाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत 'प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना' आणि 'कृषोन्नती योजना' यांसारख्या केंद्र पुरस्कृत योजनांची प्रगती तसेच त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या वापराबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर कृषी योजनांचा निधी मार्च अखेरपर्यंत खर्च करा  असे निर्देश देखील चौहान यांनी राज्यांना दिले.



बैठकीला संबोधित करताना केंद्रीय मंत्री चौहान म्हणाले की, अनेकदा केवळ प्रशासकीय आणि प्रक्रियात्मक त्रुटींमुळे बजेट वाटपास विलंब होतो, ज्याचा थेट परिणाम योजनांच्या अंमलबजावणीवर होतो. त्यामुळे राज्यांनी त्यांना आवंटित केलेला निधी मार्च महिन्यापूर्वी खर्च करणे अनिवार्य आहे. जर राज्यांनी वेळेत निधी खर्च केला नाही, तर त्याचे नुकसान राज्यांनाच सोसावे लागते. राज्यांनी योग्य नियोजनाद्वारे निधीचा वापर केल्यास केंद्राकडून पुढील हप्ता वेळेवर जारी करणे सुलभ होईल आणि योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत प्रामुख्याने 'पीएम-किसान' योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांचे त्वरित प्रमाणीकरण करणे, पीक विमा योजनेची व्याप्ती वाढवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना त्यात सामावून घेणे आणि विम्याच्या दाव्यांचे वेळेत निकाल लावणे यावर विशेष भर देण्यात आला. यासोबतच आगामी हंगामासाठी बियाणे आणि खतांची उपलब्धता, त्यांचा संतुलित वापर आणि केंद्र व राज्यांमधील समन्वय अधिक भक्कम करण्यावरही चर्चा करण्यात आली.

या महत्त्वपूर्ण बैठकीत महाराष्ट्राचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह उत्तर प्रदेशचे सूर्य प्रताप शाही, राजस्थानचे डॉ. किशोरी लाल मीणा, उत्तराखंडचे गणेश जोशी आणि मिझोरामच्या कृषी मंत्र्यांनी सहभाग घेतला. तसेच कृषी सचिव देवेश चतुर्वेदी आणि मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. कृषी क्षेत्र अधिक बळकट करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार राज्यांना सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासनही मंत्र्यांनी यावेळी दिले. ज्यांनी योग्य नियोजनाद्वारे निधीचा वापर केल्यास केंद्राकडून पुढील हप्ता वेळेवर जारी करणे सुलभ होईल आणि योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल असेही कृषीमंत्री म्हणाले.

# शेवाळाची शेती करून मिळतो मोठा नफा



शेतकरी मित्रांनो शेतीमध्ये नवनवे तंत्रज्ञान विकसीत झाले आहे त्यामुळे केवळ जमिनीतून होणारी लागवड नव्हे तर इतर पद्धतीने देखील लागवड करता येते. स्पिरुलिना लागवड म्हणजेच शेवाळाची शेती आता चांगल्या पैकी विकसीत होत आहे. त्यातून प्रचंड उत्पन्न मिळते. आरोग्यदायी फूड सप्लिमेंट म्हणून त्याचा आहारात वापर केला जातो. ते खूप महागड्या किमतीने विकले जाते. जेव्हापासून स्पिरुलिनाची टॅबलेट काढली, तेव्हापासून देशातील मोठे व्यापारीही त्याच्या लागवडीत आले आहेत. स्पिरुलिनाच्या उत्पादकांना हवे असल्यास ते स्वतः गोळ्या बनवू शकतात आणि त्यांच्या कंपनीच्या किंवा फर्मच्या लोकांना ठेवून त्या विकू शकतात. यामुळे त्यांना अधिक कमाई होईल.

स्पिरुलिना लागवडीसाठी महत्त्वाच्या गोष्टी : स्पिरुलिनाच्या लागवडीसाठी, आपण ज्या क्षेत्रात लागवड करत आहोत त्या क्षेत्राचे तापमान १५ अंश सेल्सिअस ते ४५ अंश सेल्सिअस असावे. परंतु ते १५ डिग्री सेल्सियसपेक्षा कमी नसावे. यासोबतच पाण्याचा ९ पेक्षा जास्त असावा. पण समुद्राच्या क्षेत्रापासून दूर असलेल्या भागात सोडियम क्लोराईड, बेकिंग सोडा आणि मीठ टाकून पाण्याचा पीएच वाढवता येतो.

स्पिरुलिना कशी वाढवायची : जर स्पिरुलिनाची लागवड करायची असेल, तर तुम्ही त्यासाठी टाकी बनवू शकता किंवा स्वस्तात काम करायचे असल्यास, तुम्हाला खड्डा खोदून त्यात प्लास्टिक टाकावे लागेल. त्यात आधी पाणी टाकावे लागते. तुम्ही टाकत असलेल्या पाण्याची पीएच पातळी नऊ असावी. पाण्यात प्रति हजार लिटर मागे एक किलो मदर कल्चर म्हणजेच शेवाळ स्लरी सोडल्या जातात. त्यानंतर ठराविक वेळा पर्यंत पाणी ढवळून ठेवले जाते. सुमारे ३० ते ४५ दिवसांपर्यंत स्पिरुलिनाची वाढ काढणी योग्य होते. त्यानंतर ५०० मायक्रोनच्या जाळीतून पाणी पूर्णपणे काढून टाकले जाते. तयार स्पिरुलिनाचे नूडल्स किंवा पापड करून तापमानामध्ये सुकवली जातात पावडर तयार करून पुढे यंत्राद्वारे टेबलेट्स तयार केल्या जातात.

स्पिरुलिनाचे उत्पादन दररोज सरासरी आठ ग्रॅम प्रति चौरस मीटर आहे. या अर्थाने एका एकरात दररोज ३२ किलो उत्पादन होईल. त्याची सरासरी ८०० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होते. त्यानुसार एका दिवसात २५९०० रुपये येतात. एका महिन्यात ते सात लाख रुपयांपेक्षा जास्त पैसे देते. त्याचे प्रशिक्षण भारत सरकारच्या एमएसएमई मंत्रालयाच्या अंतर्गत दिले जाते.

# बटेर पालन शेतकऱ्यांच्या हिताचा व्यवसाय

देशातील अनेक भागांमध्ये सध्या बटेर पालन (लावी पालन) व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कमी पाणी, कमी जागेत आणि कमी खर्चात देखील हा व्यवसाय केला जाऊ शकतो. ब्रॉयलर पोल्ट्री फार्मिंगच्या तुलनेत अल्प गुंतवणुकीमध्ये देखील या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात नफा कमावला जाऊ शकतो.

बटेर हा आकाराने अगदी लहान असलेला पक्षी राज्यातील अनेक भागांमध्ये 'लावी', काही भागांमध्ये 'लावरी' या ग्रामीण नावांनी ओळखला जातो. या पक्षाचे मांस हे गुणवत्तापूर्ण असते. त्यामुळे लोक त्याची खरेदी करताना पैशाचा कोणताही विचार करत नाही.

या पक्षाच्या मांसाला अन्य पक्षांच्या तुलनेत किंमतही अधिक मिळते. शिवाय ब्रॉयलर कोंबडी पालनाच्या तुलनेत यासाठी येणारा खर्च देखील अत्यंत कमी असतो. ज्यामुळे सध्या देशात जवळपास ३२ दशलक्ष इतक्या जपानी बटेर प्रजातीच्या पक्षांचे व्यावसायिक स्वरूपात पालन केले जात आहे.

जपानी प्रजाती विकसित : पोल्ट्री फार्मिंग उद्योगामध्ये कोंबडीपालन, बदक पालन यानंतर बटेर पक्षांच्या पालनाला देशात तिसरे स्थान आहे. भारतात जवळपास १९७० च्या दशकापासून बटेर पक्ष्यांच्या संरक्षणासाठी कायदा करण्यात आला आहे. मात्र त्यानंतर देशात



१९७४ साली व्यावसायिक पालनासाठी बटेर पक्षाची जपानी प्रजाती विकसित करण्यात आली आहे. त्यामुळे तेव्हापासून बटेर पालन मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

किती मिळतो नफा : पोल्ट्री क्षेत्रातील जाणकारांच्या मते, भारतामध्ये जपानी बटेर पक्षाचे पालन सहजतेने केले जात आहे. एक दिवसाचे बटेरची छोटे पिल्ले विकत घेऊन कोणी व्यवसाय सुरु करत असेल तर ही पिल्ले जवळपास ५ आठवड्यांमध्ये विक्रीसाठी तयार होतात. दोन आठवड्यांची पिल्ले विकत घेतल्यास, एका पक्षावर जवळपास ३० ते ३१ रुपये खर्च होतो. तर खर्च वजा जात आपल्याला त्यातून प्रति बटेर पक्षी निम्मा नफा भेटू शकतो.

खाद्यासह शेडचा खर्चही कमी : बटेर पालन करण्यासाठी ब्रॉयलर कोंबडी पालनाच्या तुलनेत खूपच कमी जागा लागते. ३ फूट रुंद व ५ फूट उंच असलेले बांबू जाळीचे शेड बांधून, त्यात ४०-४५ बटेर पक्षी पाळले जाऊ शकतात. अर्थात १५ स्क्वोअर फूट जाळीमध्ये ३ लेअरमध्ये १३० ते १५० बटेर पक्षी पाळता येतात. बाजारात लहान पक्षांसाठीचे खाद्य उपलब्ध असते ते तुम्ही बटेर पक्षांसाठी खरेदी करू शकता. एका बटेर पक्षाला एका दिवसासाठी सरासरी ५-१० ग्रॅम खाद्य आवश्यक असते.

अंडी विक्रीतूनही नफा : बटेर हा मांस उत्पादनासाठी पाळला जात असला तरी त्याच्या अंड्यांना देखील मोठ्या प्रमाणात मागणी असते. त्यामुळे पूर्ण विकसित झालेला ५ आठवड्यांचा पक्षी मांस विक्रीसाठी विक्री करण्याअगोदर त्यापासून मिळणाऱ्या अंड्यांमधून देखील आर्थिक कमाई केली जाऊ शकते. त्यामुळे या व्ययसायातून दुप्पट नफा कमावता येतो. ग्रामीण भागात लावीच्या अंड्यांना मोठी मागणी असते. तसेच सध्या आरोग्याच्या दृष्टीने जागरूकता वाढल्याने शहरातही या अंड्यांना मागणी असते.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८९३ : आजच्या दिवशी कोका कोला चे ट्रेडमार्क कंपनीने पेटंट स्वतःच्या नावावर केले.
१९११ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांना दुसर्या जन्मठेपेची शिक्षा झाली. तत्कालीन ब्रिटिश साम्राज्यात दोनदा जन्मठेपेची शिक्षा झालेले ते एकमेव आहेत.
१९१५ : जर्मनी ने सर्वात आधी रशिया च्या विरुद्ध घातक वायू चा प्रयोग केला होता.
१९२० : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक' या पाक्षिकावी सुरूवात
१९२९ : सोविएत रशियाने लिऑन ट्रॉटस्की याला हद्दपार केले.
१९४५ : युद्धातुन पळ काढल्याबद्दल एडी स्लोव्हिक या सैनिकाला अमेरिकेने मृत्यूदंड दिला. दुसर्या महायुद्धाच्या काळात युद्धातुन पळून गेलेल्या एकूण ४९ सैनिकांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती मात्र फक्त स्लोव्हिकच्याच शिक्षेची अंमलबजावणी झाली.
१९४९ : बडोदा व कोल्हापूर ही संस्थाने (तत्कालीन) मुंबई राज्यात विलीन झाली.
१९५० : अमेरिकन राष्ट्राध्यक्ष हॅरी एस. ट्रूमन यांनी हायड्रोजन बॉम्ब बनवण्याच्या योजनेस मान्यता दिली.
१९५० : राष्ट्रपती म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी संसदेपुढे पहिले भाषण केले. यापूर्वी ते घटना समितीचे अध्यक्ष होते.
१९९२ : राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना
२००० : हवाला केस मधील सर्व आरोपींची सुटका करण्यात आली.
२००५ : आजच्या दिवशी जोगिंदर जसवंत सिंह यांची सेनाप्रमुख म्हणून निवड झाली.
२०१० : ला हॉलीवूड चित्रपट अवतार ने २ बिलियन डॉलर रुपयांची कमाई करून सगळ्यात जास्त कमाई करणारा चित्रपट बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९६ : दत्तात्रय रामचंद्र बेन्द्रे तथा 'अंबिकातनयदत्त' कन्नड कवी, पद्मश्री (१९६८), त्यांच्या 'नाकु तंती' या काव्यसंग्रहास १९७३ मधे ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. (मृत्यू: २१ आक्टोबर १९८१)
१९२३ : परमवीर चक्र मिळणारे प्रथम भारतीय सैनिक सोमनाथ शर्मा यांचा जन्म.
१९३१ : गंगाधर महांबरे  गीतकार कवी व लेखक (मृत्यू: २३ डिसेंबर २००८)
१९३२ : पंजाब केसरी वृत्तपत्राचे संपादक विजय कुमार चोप्रा यांचा जन्म.
१९४९ : ला भारतीय चित्रपट अभिनेता राजेश विवेक यांचा जन्म.
१९७५ : प्रीती झिंटा  चित्रपट अभिनेत्री व उद्योजिका
१९७७ : मराठी चित्रपट अभिनेता अंकुश चौधरी यांचा जन्म.
१९८६ : भारतीय अभिनेत्री मनीषा केळकर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५४ : ई. एच. आर्मस्ट्राँग  एफ. एम. रेडिओचे संशोधक (जन्म: १८ डिसेंबर १८९०)
१९६१ : बिहार चे माजी मुख्यमंत्री श्री कृष्ण सिन्हा यांचे निधन.
१९६९ : अवतार मेहेरबाबा  आध्यात्मिक गुरू, मौनव्रती संत, त्यांनी सलग ४४ वर्षे मौनव्रत पाळले होते. (जन्म: २५ फेब्रुवारी १८९४  पुणे, महाराष्ट्र)
१९७२ : महेन्द्र  नेपाळचे राजे
१९८६ : विश्वनथ मोरे  संगीतकार
१९९४ : वसंत जोगळेकर  मराठी व हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक
१९९५ : सुरेश शंकर नाडकर्णी  बँकिंग तज्ञ, 'रोखे बाजार नियामक मंडळाचे'चे अध्यक्ष, पद्मभूषण
२००० : कृष्ण नारायण तथा के. एन. सिंग  हिन्दी चित्रपटांतील गाजलेले खलनायक (जन्म: १ सप्टेंबर १९०८  डेहराडून, उत्तराखंड)
२००० : वसंत कानेटकर  नाटककार (जन्म: २० मार्च १९२०)
२००४ : सुरैय्या जमाल शेख ऊर्फ 'सुरैय्या  गायिका व अभिनेत्री (जन्म: १५ जून १९२९)
२००४ : व्ही. जी. जोग  व्हायोलिनवादक (जन्म: २२ फेब्रुवारी १९२२)

# भुईमूग खत व्यवस्थापन



भुईमुग हे तेलबिया वर्गीय पिकामध्ये एक महत्वाचे पिक असुन खरीपात या पिकाखाली महाराष्ट्रात २.३६ लाख हे क्षेत्र असुन त्यापासुन २.१७ लाख टन उत्पादन आणि ९६७ क्विं/हे एवढी उत्पादकता मिळाली. उन्हाळी हंगामात हे पिक ०.८५० लाख हे क्षेत्रावर घेतले होते व त्यापासून १.१७ लाख टन उत्पादन मिळाले आणि उत्पादकता १३७४ क्विं/हे अशी होती.जमीन :मध्यम, भुसभुशीत, चुना व सेंद्रिय पदार्थ योग्य प्रमाणात असलेली व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी.पूर्व मशागत :एक नांगरट व दोन-तीन कुळवाच्या पाळ्या द्याव्यात.

पेरणीची वेळ : खरीप :१५ जून ते १५ जुलै उन्हाळी - १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी, पेरणीचे वेळी रात्रीचे किमान तापमान १८ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त असावे.

बियाणे : भुईमूगाचे वाणनिहाय बियाणे प्रति हेक्टरी खालीलप्रमाणे वापरावे. १०० किलो : एसबी - ११, टीएजी - २४, टीजी - २६, जेएल-५०१, फुले-६०२१ १२० ते १२५

किलो: फुले प्रगती, फुले व्यास, टीपीजी-४१, फुले उनप, फुले उन्नती, फुले भारती.

बीजप्रक्रीया : बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम थायरम किंवा २ ग्रॅम कार्बेन्डॅझिम किंवा ३ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे.

पेरणी अंतर : दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. व दोन रोपातील अंतर १० सें.मी.ठेवावे. उन्हाळी हंगामात जमीन ओलवून नंतर वापशावर पाभरीने अथवा टोकण पद्धतीने पेरणी करावी. टोकण पद्धतीने पेरणी केल्यास बियाणे कमी लागुन उगवण चांगली होते.

आंतरपिके : खरीप भुईमूग पिकात सोयाबीन, सूर्यफुल, तीळ, मूग, उडीद, तूर ही आंतरपीके ६:२ या प्रमाणात भुईमूग + ज्वारी १:१ तर कपाशी १:१ या प्रमाणात घ्यावी. आंतरपिकांमुळे अधिक आर्थिक फायदा होत असल्याचे प्रयोगाअंती दिसून आलेले आहे. भुईमूग + सोयाबीन (४:१) आणि कडेने एरंडीची लागवड (दोन ओळी) केल्यास पाने खाणारी अळीचे नियंत्रणास मदत होते. सुरु ऊसात उपट्या भुईमुग वाणाची आंतरपिक म्हणून लागवड करण्यासाठी ९० सें.मी. अंतरावर सऱ्या पाडून ऊसाची लागवड केल्यानंतर एक आठवड्याने १० सें.मी. अंतरावर सरीच्या दोन्ही बाजूस उन्हाळी भुईमुगाची लागवड करावी. भुईमूग + तीळ (४:१) या प्रमाणात आंतरपिक घ्यावे.

खत मात्रा : पुर्व मशागतीच्या वेळी शेवटच्या कुळवाच्या अगोदर प्रति हेक्टरी १० टन कंपोस्ट किंवा चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. पेरणीच्या वेळेस २५ किलो नत्र + ५० किलो स्फुरद द्यावे.

खत व्यवस्थापन (सुधारीत शिफारशीनुसार २०१३) भुईमुगाच्या अधिक उत्पादनासाठी रासायनिक खत मात्रे सोबत जिप्सम ४०० कि/हे (२०० कि/हे पेरणीवेळी तर उर्वरीत २०० कि/हे आऱ्या सुटतांना) जमिनीत मिसळुन द्यावे. महाराष्ट्रातील हमखास पावसाच्या विभागातील (२०१५ ची सुधारीत शिफारस) मध्यम काळ्या जमिनीत उन्हाळी भुईमुगाच्या अधिक उत्पादन, पाण्याचा व खतांचा कार्यक्षम वापर तसचे अधिक फायद्यासाठी ५ टन शेणखत प्रति हेक्टर पुर्व मशागतीच्या वेळी शेवटच्या कुळवाच्या अगोदर द्यावे. शिफारस खतमात्रेच्या १०० टक्के खते (२५:५०:०० नत्र, स्फुरद, पालाश किलो/हे.) विद्राव्य स्वरूपात ठिबक सिंचनातुन ९ समान हप्त्यात द्यावे.

आंतर मशागत : पेरणीनंतर नांग्या आढळून आल्यास बी टोकून ते ताबडतोब भरावेत. १० ते १२ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या कराव्यात व २ निंदण्या (खुरपण्या) द्याव्या. शेवटची कोळपणी थोडी खोल द्यावी त्यामुळे पिकास मातीची भर मिळते.भुईमूगाच्या आऱ्या जमिनीत जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करू नये. भुईमुगातील कार्यक्षम तण व्यवस्थापनाकरीता पेरणीनंतर लगेच पेंडीमिथॉलिन १.०० किलो क्रि.घ. प्रति हेक्टरी १० लिटर पाण्यातुन ओलीवर फवारणी करावी. तसेच पेरणीनंतर तणांच्या बंदोबस्तासाठी २०-२५ दिवसांनी परसुट किंवा टरगासुपर १५ मिली व्यापारी उत्पादन/ हे १० लिटर पाण्यातून द्यावे .

पीक संरक्षण : टिक्का व तांबेरा रोगाचा प्रादुभाव झाल्यास २५ ग्रॅम मॅन्कोझेब (डायथेन एम-४५) + २५ ग्रॅम बाविस्टीन १० लि. पाण्यात मिसळून फवारावे. भुईमुग पिकावरील रस शोषणाऱ्या किडिंसाठी मिथिल डिमेटॉन २५ ई.सी. १० मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच पाने खाणारी अळी, तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळी, अमेरिकन बोंड अळी यांचे बंदोबस्तासाठी क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मिली किंवा क्लोरपायरिफॉस २० % प्रवाही २५ मिली १० ली. किंवा सायपरमेथ्रीन २५ ईसी ४ मिली १० लि. पाण्यात फवारावे.

काढणी व उत्पादन : पीक तयार झाले म्हणजे पाने पिवळी पडू लागतात. शेंगाचे टरफल टणक बनते व शेंगाच्या टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते. अशा प्रकारे पीक तयार झाल्यावर काढणी करावी. वरील तंत्रज्ञानाचा वापर केल्यास खरीपात सरासरी १८ ते २० क्विंटल/हेक्टर तर उन्हाळी भुईमूगाचे २५ ते ३० क्विंटल/हेक्टर उत्पादन मिळू शकते.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# १५० दिवसांचा कार्यक्षम प्रशासनाचा आदर्श ; जिल्हा राज्यात तृतीय

## प्रभारी समाज कल्याण अधिकारी कामाचा खेळ खंडोबा

जालना । प्रतिनिधी

जालना समाज कल्याण अधिकारी आयुक्त कार्यालय इथे अनेक महिन्यापासून परभणी येथील समाज कल्याण अधिकारी राजू एडके यांच्याकडे जालन्याचा प्रभारी पदभार असल्यामुळे या विभागाचा प्रशासकीय कामकाजाचा खेळ खंडोबा झाला आहे . याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी लक्ष देऊन कायमस्वरूपी समाज कल्याण अधिकारी किंवा जालना येथील स्थानिक अधिकारी यांच्याकडे चार्ज देण्यासंदर्भात मागणी होत आहे. समाज कल्याण अधिकारी राजू एडके मर्जीप्रमाणे कधीही पण येणे आणि जाणे ते आपल्या मर्जीने शासनाचा कामकाज करीत आहे यावरून दिसून येत आहे.स्वाधार योजना राबविण्यासाठी सुद्धा पुरेसा व नियमित कर्मचारी वर्ग कार्यालयात उपलब्ध नसल्याने या योजनेच्या अर्जाची तपासणी संथ गतीने केल्या जात आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यात लक्ष घालण्याची मागणी केल्या जात आहे विद्यार्थी आर्थिक संकटात ज्या गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी पुरेसा पैसा नाही अशा विद्याच्यांसाठी ही योजना फायदेशीर ठरते. पण यंदा दिवाळीला पहिला हप्ता मिळणे तर दूरच शैक्षणिक वर्ष संपत येत असताना अजून दाखल अर्जाची उलट तपासणीच बाकी असल्यामुळे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना भयानक त्रास होत आहे.

अगोदर ऑनलाईन नंतर ऑफलाईन असा कारभार समाजकारण विभागाचा सुरू आहे शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार स्वाधार योजनेसाठी गरजू विद्याथ्र्यानी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने मुदतीत अर्ज सादर केले होते. परंतु त्यानंतर अचानक ८ जानेवारी पासून ऑनलाईन सादर केलेली संचिका ऑफलाईन पद्धतीने सादर करण्याचे फर्मान समाज कल्याण कार्यालयाने दिले. यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः येऊन ते सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. एकीकडे विद्यार्थ्यांनी सादर केलेलं ऑनलाईन अर्जाची अद्याप उलट तपासणी पूर्ण झालेली नसताना पुन्हा ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागवून विलंब झालेल्या योजनेला आणखी विलंब करण्यात येत आहे. शासनाच्या विशेष समाज कल्याण आयुक्त अंतर्गत व जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्वाधार योजनेच्या अर्जाची उलट तपासणी अतिशय संथगतीने करण्यात येत आहे. त्यामुळे एकूण ४५२६ प्राप्त अर्जापैकी आतापर्यंत केवळ १२७० अर्जाचीच तपासणी पूर्ण झालेली आहे. अद्याप २५१९ अर्जाची तपासणी होणे बाकी राहिल्यामुळे विद्यार्थ्यांची तारांबळ होत आहे. जिल्ह्यात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांना पात्र असून देखील वसतिगृह न मिळाल्यास अशा विद्यार्थ्यांचा राहण्याचा व इतर खर्च शासन स्वाधार योजनेमार्फत करीत असते. यासाठी उच्च माध्यमिक ते महाविद्यालय अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या सर्व पात्र अदा करण्यात येते. या योजनेस पात्र ठरण्यासाठी विविध निकष घालून देण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्षाच्या दोन टप्प्यात अर्थात पहिला हप्ता दिवाळीपूर्वी तर दुसरा व शेवटचा हप्ता शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात. येत असते. असे असताना यंदाच्या शैक्षणिक वर्षात दिवाळीनंतर प्रत्यक्षात स्वाधार योजनेसाठी अर्ज मागविण्यात आले होते. प्रत्येक वेळा अंतिम तारीख वाढवत ती वर्ष अखेर पर्यंत म्हणजेच ३१ डिसेंबर पर्यंत ठेवण्यात आली होती.

# नव्याने ओबीसी झालेले ७० मराठा बांधव रिंगणात

## सर्वच पक्षांनी दिली उमेदवारांना संधी

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी झालेल्या राज्यव्यापी आंदोलनानंतर निर्माण झालेला सामाजिक बदल आता थेट जिल्हा परिषद निवडणुकीत दिसून येत आहे. १९६७च्या कुणबी नोंदीच्या आधारे ओबीसी प्रमाणपत्र मिळालेले जिल्ह्यातील ७० उमेदवार जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक लढवत नशीब आजमवत आहे. १७ ओबीसीच्या जागेसाठी ३१ तर २९ गणासाठी ३९नवीन ओबीसींनी अर्ज दाखल केले आहे. विशेष म्हणजे राष्ट्रीय पक्षांनीही या नवीन ओबीसींना त्यांच्या पक्षाकडून उमेदवारी देत संधी दिल्या आहेत. राज्यभरात मराठा आरक्षण हा कळीचा मुद्दा राहीला आहेत. याचा मुद्द्यावर लोकसभा आणि विधासभा निवडणूका पार पडल्या त्यानंतर न्यायमुर्ती संदीप शिंदे यांच्या समितीने जुन्या नोंदीचा शोध घेतला. त्यात ऑक्टोंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२५ पर्यंत १ हजार ८८४ गावांतील नोंदी तपासल्यानंतर मराठवाड्यात २ लाख ५६ हजार ५०५ नोंदी मिळालेल्यांना कुणबी प्रमाणपत्राची वाटप करण्यात आली. आरक्षण मिळालेल्यापैकी अनेकांनी आरक्षणाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत उतरले आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत भाजप, शिवसेना, उबाठा, काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस , राष्ट्रवादी शरद पवार यांच्यातर्फे छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी नव्याने ओबीसी आरक्षण मिळालेल्या ७० जणांना संधी दिली आहेत.

जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत ओबीसीच्या गट व गणासाठीच्या जागेसाठी ओबीसीचे प्रमाणपत्र मिळालेले मराठा समाजाच्या उमेदवारांना संधी देण्यात आली आहेत. यात शिवसेनेने (शिंदे) १८ उमेदवार तर त्यापाठोपाठ आमचा डिएनए ओबीसी सांगणाऱ्या भाजपने गट व गणासाठी १६ जणांना संधी दिली आहेत. तर अपक्ष म्हणून गटासाठी ३ व गणासाठी ७ नवे ओबीसी रिंगणात आहेत. त्यामुळे पहिल्यांदा ओबीसीतून नशीब आजमावणाऱ्यांना मतदार कशी साथ देणार हे पाहणे औसुक्याचे ठरणार आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत गंगापूर तालुक्यातून गटासाठी ६ तर गणासाठी ७ जण रिंगणात आहेत.त्यापाठोपाठ खासदार संदीपान भूमरे यांच्या बालेकिल्ल्यात जिल्हा परिषद गटासाठी ५ तर गणासाठी ३ रिंगणात आहे. विशेष म्हणजे भाजप,सेना, राष्ट्रवादी व काँग्रेसने नव्याने कुणबी प्रमाणपत्रे मिळलेल्यांना संधी दिली आहे. या निवडणूकीत २७ जानेवारीपर्यंत ११९ जण रिंगणात होते.त्यात ४१ अपक्षांनी गण आणि गटातून अर्ज दाखल केले होते.

# बिलोली उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर्स कर्मचाऱ्यांची पगार रोखण्याची मागणी

## शासनाची फसवणूक करीत व्यवसायरोध भत्ता आणि घरभाडे घेतात

बिलोली । प्रतिनिधी

बिलोली उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयातील मुख्यालय न राहणाऱ्या वैद्यकीय अधिकारी तसेच मुख्यालयी आणि क्वार्टरमध्ये न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारी रोखन्यात यावे अशा प्रकारची विनंती बिलोलीतील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी केले आहेत. नॉन-प्रॅक्टिसिंग अलाउन्स () म्हणजे ''व्यवसायरोध भत्ता''. सरकारी वैद्यकीय अधिकारी (डॉक्टर) ज्यांनी खाजगी प्रॅक्टिस (खाजगी रुग्णसेवा) करणे बंद केले आहे, त्यांना त्यांच्या खाजगी उत्पन्नातील नुकसानीची भरपाई म्हणून हा विशेष भत्ता दिला जातो. परंतु येथील अनेक डॉक्टर्स भत्ता घेऊनसुद्धा खाजगी व्यवसाय करीत असल्याचे कलमुर्गे यांनी म्हटले आहेत.

वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मुख्यालयी राहत नसून काही डॉक्टर आठवड्यातून एकदा ते दोनदा येत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्याचबरोबर अनेक वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी व्यतिरिक्त इतर ठिकाणी खाजगी वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी म्हटले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार, घरभाडे भत्ता मिळवण्यासाठी कर्मचारी कामाच्या ठिकाणी (मुख्यालय) राहणे बंधनकारक आहे तसेच क्वार्टर मध्ये राहणे बंधनकारक असतानासुद्धा शासनाचे नियम पायदळी तुडविनारे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर शासनाचे फसवणूक करून घरभाडे भत्ता घेणाऱ्यावर तसेच खाजगी व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावे, अशा प्रकारची विनंती बिलोलीतील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी केले आहेत.

# मराठवाड्यात विज कंपनीकडून विद्युत स्ट्राईक

## सात जिल्ह्यात नऊ महिन्यात १७२७ विजचोरीच्या घटना उघड

हिंगोली । प्रतिनिधी

मराठवाड्यात विज वितरण कंपनीच्या वतीने मागील नऊ महिन्यात सात जिल्हयात राबविण्यात आलेल्या विद्युत स्ट्राईकमध्ये १७२७ ठिकाणच्या विजचोऱ्या उघडकीला आल्या असून विज कंपनीने या विजचोरांना १४.४७ कोटी रुपयांची दंड लावला आहे. त्यापैकी ८.८० कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती विज कंपनीच्या सुत्रांनी दिली आहे. महावितरण कंपनीच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशीक कार्यालयाकडून सह व्यवस्थापकिय संचालक आदित्य जीवने यांच्या मार्गदर्शनाखाली सात जिल्ह्यात विज पुरवठा तपसणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत



संशयास्पद असलेल्या ठिकाणी पथकामार्फत तपासणी केली जात असून त्यातून विज चोरीच्या घटना उघडकीस आणल्या जात आहेत. यामध्ये विशेष पथकामार्फत ३७९९ ठिकाणी विद्युत मिटरची तपासणी व अनियमिततेची पाहणी करण्यात आली आहे. यामध्ये १७२७ विज मिटरमध्ये विजचोरी झाल्याचे आढळून आले आहे.

यापथकाने सर्व ठिकाणी विज चोरीची आकडेवारी तपासल्यानंतर १.६० कोटी युनीट विज चोरी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विजचोरीची अदांजे रक्कम १४ कोटी ४७ लाख रुपये एवढी झाली आहे. त्यानुसार संबंधित विज ग्राहकांना कायदेशीर कारवाईचा इशारा दिल्यानंतर त्यापैकी ८.८० कोटी रुपयांची रक्कम वसुल करण्यात आली आहे. तर ५५ ठिकाणी विज चोरांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर शहरात ३६४ ग्राहकांना ३.८२ कोटी रुपये दंड लावण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण भागात २२२ ग्राहकांना २.१६ कोटी रुपये, जालना २४१ ग्राहकांना १.६५ कोटी रुपये, बीड जिल्हयात ९९ ग्राहकांना ९८ लाख रुपये, धाराशिव जिल्हयात २१० ग्राहकांना १.६० कोटी रुपये, लातुर जिल्ह्यात २६८ ग्राहकांना १.९९ कोटी रुपये, नांदेड जिल्हयात २७४ ग्राहकांना १.७१ कोटी रुपये, परभणी ४९ ग्राहकांना ३७ लाख रुपये दंड लावण्यात आला आहे. त्यापैकी ८ कोटी ८० लाख रुपयांचा दंड वसुल करण्यात आला असून अद्यापही दंड वसुलीची कारवाई सुरु असल्याचे सुत्रांनी सांगितले. मराठवाड्यात विज चोरी रोखण्यासाठी महावितरण कडून विद्युत स्ट्राईक सुरच राहणार आहे. त्यामुळे ग्राहकांनी अनाधिकृत विजेचा वापर करू नये. अनाधिकृत विज वापरणाऱ्यांवर विद्युत कायद्यानुसार कारवाई केली जाणार आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/१०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १५/१/२०२६

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)वर्षा संतोष काळबंडे सर्व्हे नं.-९१प्लॉट नं. ८७ नं.प.मि.नं.१८-७६-८७ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (८७) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : प्लॉट नं. ८८
दक्षिण- ६ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तरः मिरादेवी नारायण काळबांदे व नारायण बाबासाहेब काळबांदे यांनी आज रोजी खरेदी केलेला प्लॉट मधील

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

**जाहिरनामा**

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८३१/२०२५**
**विधीज्ञ एम.आर.उबाळे**
**विक्रम धुमाळ व इतर वि. निरंक**

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः

१) विक्रम पि. उत्तम धुमाळ, वय ४७ वर्षे, धंदा- शेती, रा. धुमाळवाडी, ता.जि.बीड रा. निवारा बिल्डींग नं. १, प्लॉट नं. ३, सहयोग नगर, बीड, ता.जि.बीड.

२) उत्तम पि. बाळा धुमाळ, वय ९० वर्षे, धंदा- शेती, रा. सदर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे राधाबाई भ्र. उत्तम धुमाळ या दिनांक २३/०८/२०२४ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार क. १ ही मयताचा मुलगा असून अर्जदार क. २ हे मयताचे पती आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे राधाबाई भ्र. उत्तम धुमाळ यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत राधाबाई भ्र. उत्तम धुमाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०४/०२/२०२६ आहे.

आज दिनांक १९/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित
**क. लिपीक**
३ रे सह दिवाणी न्यायालय
व. स्तर बीड

आदेशावरून,
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

# महामार्गावर मालट्रक अडवून तब्बल ३० हजार ९९० किलो गहू पळवला

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर/पाथर्डी मध्यप्रदेशातून सोलापूरच्या दिशेने गहू घेऊन जाणारा मालट्रक चोरट्यांनी लुटला. ड्रायव्हरचे हातपाय बांधून ठेवत ट्रकमधील ३० हजार ९९० किलो म्हणजे सुमारे ३१ टन गव्हाचे ९३३ पोते चोरट्यांनी दुसऱ्या ट्रकमध्ये भरून पळवले. २७ जानेवारी रोजी रात्री ही घटना घडली. या प्रकरणी जगदीश चतभुज माळी (वय ५५, रा. लहुजा, जि. मंदसौर, मध्यप्रदेश) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जगदीश माळी हे ट्रकमध्ये गव्हाचे कट्टे भरून सोलापूरकडे निघाले होते. देहरे टोल नाक्याजवळ चार अनोळखी इसमांनी १२ टायर ट्रक माळी यांच्या ट्रकसमोर आडवा लावला. चोरट्यांनी माळी यांना चाकूचा धाक दाखवून



धमकावले आणि त्यांचे हातपाय बांधले. त्यानंतर माळी यांच्या ट्रकमधील ७ लाख ९९ हजार २०० रुपये किमतीचे ८३३ कट्टे आणि १ लाख ६८ हजार रुपये किमतीचे १२० कट्टे असा ९ लाख ६७ हजार २०० रुपयांचा ३१ टन गहू स्वतःच्या ट्रकमध्ये भरून पोबारा केला. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. चोरट्यांनी ट्रक चालकावर पाळत ठेवून माल लुटला अहिल्यानगर - मनमाड महामार्गावरील देहरे टोल नाका परिसरात दिवसरात्र वाहनांची वर्दळ असते. टोल नाका बंद असून सदरचा परिसर रात्रीच्या वेळी निर्मनुष्य असतो. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी ट्रक चालकावर पाळत ठेवून व तो ट्रकमध्ये एकटा असल्याने देहरे टोलनाक्याजवळ ट्रक अडवला. रस्त्याच्या कडेला कायम एका ट्रकमधून दुसऱ्या ट्रकमध्ये माल भरण्याचे काम सुरू असते. त्यामुळे वाहनांची वर्दळ असली तरी याकडे दुर्लक्ष झाले असावे, असा अंदाज व्यक्त होत आहे.

# दास नवमीनिमित्त राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामींचे रथयात्रा पालखी सोहळा

बीड । प्रतिनिधी

दास नवमीनिमित्त राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामींचे रथयात्रा पालखी सोहळा खंडेश्वरी मंदीराजवळ प्रल्हाद हनुमान मंदीरात मुक्कामी राहणार असून भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी केले आहे.

दास नवमीनिमित्त राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामींचे रथयात्रा पालखी सोहळा दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी समर्थांची जन्मभूमी जांब समर्थ घनसांगवी जि.जालना ते सज्जनगड जि.सातारा दरवर्षी जात असते, जांब समर्थ व पंचक्रोशीतील समर्थ भक्त मोठ्या प्रमाणावर या सोहळ्यात सहभागी होतात. दरवर्षी बीड शहरातील खंडेश्वरी परिसरातील प्रल्हाद हनुमान मंदीरात पालखीचा मुक्काम असतो, त्याठिकाणी समर्थांची उपासना, हरिपाठ, पंचपदी व महाप्रसाद असतो. दुसऱ्या दिवशी प्रल्हाद हनुमान मंदीरातून रथयात्रा निघून विठ्ठल मंदीर एकनाथ महाराज येथे नाष्टा, चहापाणी होवून दुपारी गजानन मंदीर येथे गजानन सांस्कृतीक मंडळाच्या वतीने महाप्रसाद होऊन पालखी निघते. ज्ञानेश्वर कुलकर्णी पंचायत समिती निवासस्थान येथे समर्थांची पुजा व चहापाणी होऊन रथयात्रेसोबत आलेल्या समर्थ भक्तांचा सत्कार व चहापाणी होऊन पालखी नगर रोडकडे प्रस्थान करते. तेथील ह.भ.प.भास्कर महाराज जोशी यांचे गजानन मंदीरात समर्थांची महापुजा, नाष्टा, चहापाणी होऊन रथयात्रा पालखी सोहळा सज्जनगड कडे मार्गस्थ होईल.

# ६६ कोटींची योजना मंजूर; नोव्हेंबरला वर्कऑर्डर देवूनही कामाची प्रतीक्षाच

## कळंब शहरासाठी जुन्या लोकसंख्येनुसार पुरवठा केल्याने अडचण

कळंब । प्रतिनिधी

शहराची लोकसंख्या व विस्तार दिवसेंदिवस वाढत असून, लोकसंख्येनुसार पाणीपुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत कळंब शहरासाठी सुमारे ६६ कोटी रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. या योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही. मांजरा प्रकल्पातुन कळंब शहरासह लगत असलेल्या डिकसळ गावाला पाणी पुरवठा करण्यात येतो. कालांतराने शहराची लोकसंख्या वाढल्यामुळे जिवन प्राधिकरण च्या नियमानुसार वाढीव पाणी पुरवठा करण्याकरीता शहरालगतच्या डिकसळ गावाच्या हद्दीमध्ये सन २००५ मध्ये जलशुध्दीकरण केंद्र बांधण्यात आले आहे. येथुन कळंब शहराला व डिकसळ या गावाला पाणी पुरवठा




करण्यात येत आहे.

शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. आणि पाणी पुरवठा योजना जुन्या लोकसंख्यानुसार असल्यामुळे शहरात पाणी पुरवठा करण्यास अडचण निर्माण होत होती. दिनांक २२ जुलै २०२१ च्या सर्वसाधारण सभेत या योजनेचा ठराव मंजूर करण्यात आला होता, त्यानंतर तत्कालीन माजी नगराध्यक्ष सुवर्णा मुंडे, माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा व प्रशासकीय अधिकारी यांनी या योजनेचा परिपूर्ण प्रस्ताव बनवून महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला होता. त्यानंतर सर्व बाबींची पुर्तता झाल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सदरील पाणी पुरवठा योजनेस मान्यता दिली होती. त्यानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. महाअभियान योजनेंतर्गत कळंब शहरासाठी ६६ कोटी १० लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे. या योजनेत नवीन जॅकवेल, वाढीव वॉटर पंपसेट तसेच इतर आवश्यक बाबींचा समावेश करण्यात येणार आहे. वाढीव पाणीसाठा आरक्षणास मंजुरी कळंब नगरपालिकेने दिनांक २७ मार्च १९९८ रोजी मांजरा प्रकल्पातून १.४९ दलघमी पाणी आरक्षित केले होते. मात्र मागील काही वर्षांत लोकसंख्या वाढल्यामुळे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान योजनेंतर्गत वाढीव पाणी आरक्षणासाठी प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे सादर करण्यात आला. त्यानुसार जलसंपदा विभागाने शहरासाठी ०.८४६१ दलघमी अतिरिक्त पाणी आरक्षण मंजूर केले आहे. त्यामुळे एकूण कळंब नगरपालिकेसाठी २.३४ दलघमी पाणी साठा आरक्षित झाला आहे. लवकरच कामास सुरुवात कळंब शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पाणीपुरवठा बळकटीकरण योजना मंजूर झालेली आहे. या योजनेची प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच कामास सुरुवात होणार आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर कळंब शहराचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेल. दररोज २५ लाख लिटर पाणीपुरवठा : कळंब शहरापासून सुमारे २३ किलोमीटर अंतरावर धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून पाइपलाइनद्वारे शहराला पाणीपुरवठा केला जातो. सध्या सुमारे ३० हजार लोकसंख्येनुसार जीवन प्राधिकरणाच्या नियमानुसार दररोज २५ लाख लिटर पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र शहराचा विस्तार व लोकसंख्या वाढ लक्षात घेता भविष्यातील गरजांसाठी नगरोत्थान अभियानांतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. त्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

# बीडमधील ऐतिहासिक श्री खंडोबा मंदिरातील दिपमाळेच्या दुरुस्तीला लवकरच सुरुवात

## विश्वस्त मंडळाच्या पाठपुराव्याला यश –रामनाथ खोड

बीड । प्रतिनिधी

श्री खंडोबा दिपमाळ मंदिरातील ऐतिहासिक दिपमाळेची अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेली होती. पावसाळा, ऊन व काळाच्या ओघात ही दिपमाळ झिजत चालली होती या ऐतिहासिक वास्तूची आजवर कोणत्याही शास्त्रीय पद्धतीने दुरुस्ती झालेली नव्हती. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूच्या अस्तित्व तो वारसा टिकवण्या करिता विश्वस्त मंडळ सतत पुरातत्व खात्याकडे अणि जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करत होतं अणि तिची अवस्था पाहून नागरिकांत ही चिंतेचे वातावरण निर्माण झालं होतं. आता होत होणार असलेल्या दुरुस्तीच्या कामामुळे नागरिक ही चिंता मुक्त झालेले आहेत.

कारण या ऐतिहासिक दिपमाळेच्या दुरुस्तीच्या कामास लवकरच सुरुवात होणार असून हे काम पुरातत्व खात्यामार्फत करण्यात येणार आहे. दुरुस्तीचे काम अंदाजे एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने दिपमाळ दुरुस्तीच्या कामाचा दर्जा, पद्धत व तांत्रिक बाबी यावर पुरातत्व विभाग व देवस्थान ट्रस्टी यांच्यात सविस्तर चर्चा झाली. मंदिराच्या ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वाचा विचार करता दुरुस्तीच्या कामात कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही, अशा स्पष्ट सूचना देवस्थान ट्रस्टींकडून देण्यात आल्या आहेत. दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर दिपमाळेचे सौंदर्य व सुरक्षितता वाढण्यास मदत होणार असून मंदिराच्या ऐतिहासिक वैभवात भर पडणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व लक्षात घेता दिपमाळेची दुरुस्ती पुरातत्व विभागाच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. दुरुस्ती करताना मूळ बांधकाम रचना, दगडी कामाची शैली व ऐतिहासिक स्वरूप कायम ठेवले जाईल. शास्त्रीय संवर्धन पद्धतीचा अवलंब करून भाविकांच्या सुरक्षिततेलाही प्राधान्य दिले जाणार असल्याची माहिती देण्यात आली.
-रामनाथ खोड
कोषाध्यक्ष :- रामनाथ खोड श्री खंडोबा दिपमाळ मंदिर बीड



# उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निधनाने शोककळा; रविवारी माजलगावात शोकसभा





माजलगाव । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांचे आपघाती निधन झाले. त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी माजलगाव तालुक्याच्या वतीने रविवार, दिनांक १ फेब्रुवारी रोजी सर्व राजकीय पक्ष व संघटनेच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान आपघातात निधन झाले. त्यांच्या निधनाने राज्यभर शोककळा पसरली असून शासनाच्या वतीने तिन दिवसांचा दुखवटा जाहिर करण्यात आलेला आहे. माजलगाव येथे रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी गणपती मंदिर, जुना मोंढा, माजलगाव येथे सर्व राजकीय पक्ष, संघटनांच्या वतीने अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेला सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, संघटनेचे पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या वतीने करण्यात आले"

# श्री क्षेत्र मिराबाई आईसाहेब संस्थान येथे आज काल्याचे कीर्तन



पाटोदा । प्रतिनिधी

श्री क्षेत्र मिराबाई आईसाहेब संस्थान येथे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता उद्या, शनिवार दिनांक ३१ जानेवारी रोजी होणार आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे सकाळी १०ते १२ होणारे ह.भ.प. राधाताई आई साहेब महाराज यांचे काल्याचे कीर्तन.

या मंगलप्रसंगी महासांगवी कवडवाडी आणि पाटोदा परिसरातील संपूर्ण पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वतः राधाताई आई साहेब महाराज आणि संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. भक्ती आणि शक्तीचा संगम असलेल्या या सोहळ्यात सहभागी होऊन विठ्ठल नामाचा आणि काल्याच्या प्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

# दादा केवळ नेते नव्हे तर लाखो कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान होते- आ. संदीप क्षीरसागर



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बीड जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने राष्ट्रवादी भवन, बीड येथे शुक्रवारी (दि.३०) रोजी महाराष्ट्राचे लाडके दिवंगत नेते स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.

दादा हे केवळ नेते नव्हते, तर हजारो कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान होते. राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून बीड जिल्ह्याच्या पालकत्वाची जबाबदारी स्वीकारून त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. कठोर शिस्त, कामाला सर्वोच्च प्राधान्य, पारदर्शकता आणि स्वच्छतेची जाणीव हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होते. सामान्य कार्यकर्त्याला ताकद देणारा, आत्मविश्वास देणारा नेता म्हणून ते कायम स्मरणात राहतील. त्यांच्या अकाली जाण्याने बीड जिल्ह्याने एक सक्षम नेतृत्व गमावले ◀◀ पान ३ वर

# किमतीपेक्षा जास्त दराने युरिया खताची विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर तात्काळ कारवाई करा –प्रा.बबनराव आंधळे



बीड । प्रतिनिधी

दिनांक ३०.१.२०२६ जिल्ह्यातील शेतकरी अतिवृष्टीने होरपळून निघाला आहे यावर्षी कापूस व सोयाबीन काढून ज्वारी बाजरी गहू भुईमू पीक घेऊन कुठेतरी आशेचा किरण पाहत असताना व्यापारी व कृषी सेवा केंद्र चालक युरियाचा साठा करून कृत्रिम तुटवडा निर्माण करत आहेत तसेच जास्त दराने युरिया खताची विक्री करत असल्याचे दिसून येत आहे याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित कार्यवाही करावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे युरिया खताची साठेबाजी करून शेतकऱ्यांना २६६ रुपये किमतीचा युरिया ४०० ते ५०० रुपये किमतीने विकला जात आहे हे दुर्दैव आहे. खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्या व जास्त भावाने युरिया खताची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी या मागणी करिता ग्रामीण युवक संघटना आता रस्त्यावर आलेली आहे किमतीपेक्षा जास्त भावाने विक्री करणाऱ्या व्यापारी व कृषी सेवा केंद्र चालक यांना आपल्याकडील युरियाचा साठा किती आहे याचा माहिती फलक लावणे बंधनकारक करावे शेतकऱ्या ची आडवणूक करून जास्त दराने युरिया खताची विक्री करणाऱ्यांचा परवाना तात्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे नसता संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# मच्छिंद्रनाथ गडाच्या दरीत आढळले दोन कुजलेले मृतदेह



आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील सावरगाव येथील मच्छिंद्रनाथ देवस्थान (मायंबा) परिसरात गुरुवारी एक हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. देवदर्शनासाठी आलेल्या दोन भाविकांचे मृतदेह गडावरील खोल दरीत आढळून आले असून, यातील एका तरुणाचा केवळ सापळा उरला आहे, तर वृद्धाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळला.

गडावरील खोल दरीत सरपण गोळा करण्यासाठी काही स्थानिक नागरिक गेले होते. दरीच्या दुर्गम भागात त्यांना मानवी अवशेष दिसताच त्यांनी गावात धाव घेऊन माहिती दिली. अंभोरा पोलीस ठाण्याचे सहायक ◀◀ पान ३ वर



# आदित्य पॉलीटेक्निकच्या दोन विद्यार्थ्यांची भारतीय नौदलात निवड

### योग्य दिशा, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि संस्थेच्या सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचे उज्वल करिअर घडते- डॉ. आदित्य सारडा

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थांना पुस्तकी ज्ञानाबरोबर विविध करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. योग्य दिशा, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि संस्थेच्या सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल करिअर घडते, असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी केले. आदित्य पॉलीटेक्निकच्या दोन विद्यार्थ्यांची भारतीय नौदलात 'सेलर ()' पदावर निवड झालेल्या विद्यर्थांचा सत्कार करतांना ते बोलत होते.

आदित्य शिक्षण संस्थोच्या आदित्य पॉलीटेक्निक, बीड येथील दोन विद्यार्थ्यांनी भारतीय नौदलात 'सेलर ()' या प्रतिष्ठित पदावर निवड मिळवून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि मार्गदर्शनाची उंची पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा (२०२४ पासआऊट) मधील विद्यार्थी अनिकेत आसाराम राख तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थी सुबोध भागवत औटे (प्रवेश वर्ष २०२१२०२४) यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर करिअरच्या विविध संधींबाबत योग्य दिशा देण्याचा संस्थेचा दृष्टिकोन या निवडीमागे महत्त्वाचा ठरला आहे. या निवडीबद्दल संस्थेच्या वतीने अनिकेत राख व सुबोध औटे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांचे हे यश वैयक्तिक असले तरी, विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यासाठी कटिबद्ध असलेल्या आदित्य पॉलीटेक्निकच्या गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाची ही ठळक पावती असल्याची भावना पालकांमधून व्यक्त होत आहे.विद्यार्थ्यांचा सत्कार ◀◀ पान ३ वर

### योग्य मार्गदर्शन आणि मेहनतीचे यशस्वी फळ – आसाराम राख

आदित्य पॉलीटेक्निकने अनिकेतला शिक्षणकाळात वेळोवेळी योग्य मार्गदर्शन दिले. अभ्यासासोबतच शिस्त, सातत्य आणि करिअरविषयक दिशा मिळाल्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला. अनिकेतचा कष्टाळूपणा, चिकाटी आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यांची सांगड घातल्यामुळेच आज त्याला भारतीय नौदलात 'सेलर पदावर निवड मिळू शकली, अशी भावना वडील आसाराम राख यांनी व्यक्त केली.

# साठ लाखाचे दागिणे चोरी प्रकरणात तिघे ताब्यात

बीड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्याला हादरवून सोडलेल्या साठ लाखाच्या सोने–चांदी लुट रोडरॉबरी प्रकरणात आता धक्कादायक वळण समोर आले आहे.व्यापाऱ्याच्या दुकानातीलच कोणी परिचित व्यक्तीने ही टीप दिली असल्याची माहिती मिळत आहे.दरम्यान सदरील प्रकरणात बीड गुन्हे शाखेने तिघांना शुक्रवारी माजलगावातून उचलल्याची माहिती असून उर्वरित आरोपीच्या शोधासाठी व मुद्देमाल ताब्यात घेण्यासाठी माजलगाव ग्रामीण पोलीस बीडला रवाना झाले असल्याचे कळते.

माजलगाव शहरातील अमोल पंढरीनाथ गायके या सराफा व्यापाऱ्याला रविवार दि.२५ रोजी शस्त्राचा धाक धाकून त्याच्याकडील ६० लाख रुपयाचे सोने–चांदी लुटल्याची घटना घडली होती.दिवसाढवळ्या झालेल्या या रोड रॉबरीने संपूर्ण बीड जिल्ह्यात पोलिसांच्या

अब्रूची लक्तरे वेशीला टांगल्या गेली होती. दरम्यान सदरील प्रकरणात बीड गुन्हे शाखेने तपासाची गती तीव्र फिरवत या गुन्ह्यातील तीन संशित आरोपींना शुक्रवारी सकाळी माजलगावातून ताब्यात घेतले असल्याची माहिती आहे.डउइ पथकाने तीन संशयितांना उचलून कसून चौकशी सुरू केली असून, त्यांच्या जबाबांवरून उर्वरित आरोपी,मध्यस्थ आणि आर्थिक दुवे उघड होण्याची दाट शक्यता आहे.

दरम्यान त्या दिशेने मुद्देमाल, उर्वरित आरोपी पकडण्यासाठी पोलिसांनी तपासाची गती पकडली आहे.प्राथमिक चौकशीत'आतल्या माहितीच्या आधारेच हा गुन्हा रचल्याची शक्यता ◀◀ पान ३ वर

# अकोला गावातील ओबीसी महिला सरपंचाचा राजीनामा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील अकोला गावातील ओबीसी सरपंच महिलेने गावातील विकास कामात ग्रामपंचायत सदस्य आणि काही नागरिकांचा त्रास होत असल्यामुळे शुक्रवार रोजी गटविकास अधिकारी अंबाजोगाई यांच्याकडे राखी दीपक अंधारे यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिला आहे. सरपंच महिलेला गावातील विकास काम करण्यामध्ये गावातील ग्रामपंचायत सदस्य आणि काही ठराविक नागरिक अडथळा निर्माण करीत असल्यामुळे सरपंच पदाचा राजीनामा देण्यात आला आहे. मी एक ओबीसी महिला सरपंच आहे. गावातील नागरिकांनी मोठे अपेक्षेने मला सरपंच पदावर निवडून दिले आहे. मी प्रमाणिक विकास काम करण्याचा प्रयत्न करीत असून गाव पातळीवर काही गावातील नागरिक आणि ग्रामपंचायत सदस्य त्रासदायक वागणूक देत असल्यामुळे मला राजीनामा देण्याची वेळ आली आहे. गावात खूप विकास कामे करण्याची अपेक्षा असून गाव पातळीवर खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पंचायत समितीचे अधिकारी देखील सहकार्य करीत नाहीत. यामुळे मी सरपंच पदाचा राजीनामा दिला आहे.आधी पैसे द्या नंतर काम करा अशी काही नागरिक मागणी करीत आहेत. माझ्यावर अन्याय होत असल्यामुळे सरपंच पदाचा राजीनामा दिला आहे. ◀◀ पान ३ वर

# अजितदादांसारखा नेता पुन्हा होणार नाही

## आष्टीतील सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेत आ. सुरेश धस यांचे मत



आष्टी । प्रतिनिधी

राजकारणात पक्षभेद विसरून केवळ जनतेच्या विकासाला प्राधान्य देणारे, निर्णयक्षमतेचा धडाका दाखवणारे आणि प्रशासन हलवून सोडणारे धुरंदर नेतृत्व म्हणजे अजितदादा पवार होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने केवळ एक उपमुख्यमंत्री नाही, तर विकासाचा बुलडोझर गमावला आहे, असे स्पष्ट मत लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनी व्यक्त केले.

आष्टी शहरातील पंचायत समिती प्रांगणात आयोजित सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेत ते बोलत होते.

आमदार धस म्हणाले, "कुठल्याही पक्षाचा आमदार असो, विरोधी पक्षाचा असो जनतेचे काम असेल तर अजितदादा कधीही नाही म्हणाले नाहीत. पक्षभेद, गटतट, राजकीय आकस यांना त्यांच्या राजकारणात स्थान नव्हते. काम मोठे की माणूस मोठा, याचा निर्णय ते विकासाच्या निकषावर घ्यायचे."

विरोधी पक्षाचा आमदार जरी काम घेऊन गेला तरी ते मोठ्या आत्मीयतेने, प्रचंड पाठपुराव्याने ते काम पूर्ण करून द्यायचे. म्हणूनच ते केवळ नेते नव्हते, तर महाराष्ट्राच्या प्रशासनाचा कणा होते.

"अजितदादा पवार यांच्यासारखा पुतण्या संपूर्ण जगात कुठेही सापडणार नाही. चुलत्यासाठी अखेरपर्यंत ढाल बनून उभा राहणारा, पक्षासाठी संघर्ष करणारा आणि संकटात कधीही पळ न काढणारा असा निष्ठावंत योद्धा आजवर कोणी पाहिला नाही. अजितदादांसारखे नेतृत्व पुन्हा जन्माला येणे अशक्य आहे," असे ते म्हणाले. ते खऱ्याला खरं आणि खोट्याला खोटंच म्हणणारे होते. कोणाला घाबरून नव्हे, तर सत्याच्या बळावर ते निर्णय ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात भाजपकडून गणेश बिडकर यांची गटनेतेपदी नियुक्ती, महापौरपदाचा निर्णय कधी होणार ?

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक आणि मोठा विजय मिळवला आहे. तब्बल ११९ नगरसेवक निवडून आणले आहेत. या विजयासोबतच आज भाजपकडून गणेश बिडकर यांची गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. येत्या तीन तारखेला महापौरपदाचा निर्णय जाहीर होणार आहे. पुण्याचा पुढील महापौर कोण असेल हेही लवकरच स्पष्ट होणार आहे.

गेल्या चार वर्षांपासून पुणे महानगरपालिका प्रशासकांच्या ताब्यात होती. त्यामुळे आता सत्ताधारी भाजप पक्षावर मोठी जबाबदारी असणार आहे. पुणेकरांनी भाजपवर मोठा विश्वास दाखवत ११९ नगरसेवक निवडून दिले असून, या विश्वासाला सार्थ ठरवण्याचे आव्हान पक्षासमोर आहे. निवडणूक प्रचारादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक विकासात्मक आश्वासने दिली होती. त्यामध्ये नवीन आणि दर्जेदार रस्ते, पिण्याच्या पाण्याचा कायमस्वरूपी प्रश्न



सोडवणे, अंतर्गत व जोडरस्त्यांचे जाळे मजबूत करणे तसेच पीएमपीएल सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करणे या प्रमुख मुद्द्यांचा समावेश आहे. या सर्व आश्वासनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर दिला जाणार आहे.

गणेश बिडकर नेमकं काय म्हणाले ?

मी यापूर्वीही दोन वेळा गटनेतेपदाची जबाबदारी सांभाळली आहे. यावेळी पुन्हा माझ्यावर हा विश्वास टाकण्यात आला, याचा मला अभिमान आहे असे गणेश बीडकर म्हणाले. जरी मी वेगळ्या पक्षात असलो तरी खमके नेते अजित पवार यांनी नेहमी माझ्यावर विश्वास ठेवला होता. विकासकामांसाठी मला मार्गदर्शन केले आणि मदतही केली. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाची कमतरता माझ्या मनात कायम राहील असे बीडकर म्हणाले.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत तब्बल ११९ जागांवर कमळ फुलले असून, भाजपची एकहाती सत्ता आली आहे. भाजपला रोखण्यासाठी एकत्र आलेल्या दोन्ही राष्ट्रवादींचा मोठा पराभव झाला आहे. राष्ट्रवादीला केवळ ३० जागा जिंकता आल्या आहेत. काँग्रेसने मात्र गेल्यावर्षीच्या ९ जागांवरून १५ जागांवर मजल मारली आहे. दुसरीकडे उद्धवसेनेला केवळ एका जागेवर विजय मिळवता आला, तर शिंदेसेना आणि मनसेला खातेही खोलता आलेले नाही. या निवडणुकीत अनेक दिग्गजांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

आमच्या पक्षाने प्रत्येक कार्यकर्त्याला व नगरसेवकाला न्याय दिला या ११९ नगरसेवकांपैकी सुमारे ८० नगरसेवक प्रथमच पुणे महानगरपालिकेत निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांना विश्वासात घेऊन, अनुभव आणि नव्या ऊर्जेचा समन्वय साधत पुढे जाण्याची मोठी जबाबदारी गटनेता म्हणून माझ्यावर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, आमच्या पक्षाने प्रत्येक कार्यकर्त्याला व नगरसेवकाला न्याय दिला आहे. महापौरपदासाठी योग्य आणि सक्षम उमेदवाराची निवड वरिष्ठ नेते लवकरच करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# अजित दादांची शेवटची इच्छा पूर्ण होणार? दोन्ही 'राष्ट्रवादी' पुन्हा एकत्र येणार?

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबई उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली एक्झिटने राज्याच्या राजकीय पटलावर व्यापक बदल घडण्याची चिन्हे आहेत.

त्यातून दोन स्वतंत्र पक्षांमध्ये विभागलेल्या मूळच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे एकीकरण अटळ मानले जात आहे. त्याविषयीची घोषणा फेब्रुवारीच्या मध्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अजित पवार यांच्या निधनामुळे राज्य सरकार प्रमाणेच दोन्ही राष्ट्रवादींच्या स्तरावर महत्वाचे फेरबदल अपरिहार्य बनले आहेत. काही दिवसांपूर्वी झालेल्या महापालिका निवडणुकांवेळीच दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांच्या जवळ आल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर स्वत: अजित पवार दोन्ही पक्षांच्या एकीकरणासाठी आग्रही होते. त्यासंदर्भात काही बैठकाही झाल्या, अशी माहिती त्या



पक्षांच्या गोटातून पुढे येत आहे.

राष्ट्रवादीच्या नेत्यांनी घेतली मुख्यमंत्र्याची भेट

दरम्यान, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महत्वाचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी दाखल झाले आहेत. नेत्यांची मुख्यमंत्र्यांसोबत सव्वा तास बैठक चालली असून आता बैठक संपली आहे. कालही रात्री उशिरा मुख्यमंत्र्यांची राष्ट्रवादीच्या नेत्यांनी भेट घेतली होती.

अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे पक्षात मोठी पोकळी निर्माण झाली असून, उपमुख्यमंत्री कोण होणार आणि राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्षकडे पद कुणाला मिळणार तसेच अजित पवार यांच्याकडे असलेली खाती कुणाकडे जाणार असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी आम्हाला लवकरत लवकर निर्णय घ्यायचा आहे, याबाबत आम्ही मुख्यमंत्र्यांना सांगितले असल्याचे विधान केले आहे.

# मोठी बातमी : दादांच्या निधनाने कोसळलेले शरद पवार पुन्हा उभे राहिले, नीरेच्या पाहणीसाठी पोहोचले, बारामतीची सूत्रं पुन्हा हाती घेतली!

**पुणे । प्रतिनिधी**

शरद पवार नावाची व्यक्ती नेमकं काय रसायन आहे हे भल्याभल्यांना समजलं नाही म्हटलं जातं, त्याचीच पुन्हा एकदा प्रचीती आल्याचं दिसतंय. अजित पवारांच्या निधनानंतर एकीकडे उपमुख्यमंत्रिपद कुणाला मिळणार याची चर्चा सुरू असताना दुसरीकडे स्वतः शरद पवार बारामतीच्या राजकारणात सक्रिय झाल्याचं दिसून आलं. बारामतीतून वाहणाऱ्या नीरा नदीच्या प्रदूषणाची पाहणी करण्यासाठी शरद पवार हे थेट नदीकाठी पोहोचले.

बारामतीची सूत्रं पुन्हा हाती घेतली

अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर शरद पवार हे भावुक झाल्याचं अनेकांनी पाहिलं. त्यांच्या निधनानंतर बारामती




पोरकी झाली, त्याचे पुढे काय होणार अशी चर्चा सुरू झाली. त्याचवेळी आता शरद पवार हे स्वतः राजकारणात पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचं बारामतीकरांनी पाहिलं. शरद पवार बारामतीतून वाहणाऱ्या निरा नदीची पाहणी करण्यासाठी पोहोचले. बारामती शेजारील नीरा वाघज गावात नीरा नदीच्या प्रदूषणाची पाहणी शरद पवारांकडून करण्यात आली.

अनेक वर्षांपूर्वी शरद पवारांनी बारामतीचा कारभार अजित पवारांकडे सोपवला होता आणि स्वतः देशाच्या राजकारणात लक्ष घातलं होतं. तेव्हापासून अजित पवार बारामतीच्या समस्यांचे निराकरण करायचे. मात्र, अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर बारामतीची सूत्रे स्वतः शरद पवारांनी हाती घ्यायचं ठरल्याचं दिसतंय.

एकीकडे अजित पवारांच्या अस्थींचे विसर्जन करण्यासाठी पवार कुटुंबीय बारामती जवळील सोनगावमध्ये पोहचले. त्याचेवेळी शरद पवार मात्र नीरा वाघज गावात प्रदूषित नदीची पाहणी करण्यासाठी पोहोचल्याचं दिसतंय.

अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीचे नेत्यांनी सुनेत्रा पवारांनी बारामतीचं नेतृत्व करावं अशी गळ घातल्याचं दिसतंय. सुनेत्रा पवारांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देऊन बारामतीमधून विधानसभा लढवावी आणि उपमुख्यमंत्रिपद घ्यावं. तसेच पार्थ पवारांनी राज्यसभेवर जावं यासाठी काही ज्येष्ठ नेते प्रयत्नशील आहेत. तसेच अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे अस्तित्वही स्वतंत्र राहावे यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. नेमक्या त्याच वेळी आता शरद पवार पुन्हा बारामतीमध्ये सक्रिय झाल्याचं दिसून येतंय. बारामती आणि शरद पवार हे जुनं नातं पुन्हा अधोरेखीत करण्याचा प्रयत्न असल्याचा हा प्रयत्न असल्याचीही चर्चा आहे.


# तरुणीवर पिस्तूल रोखलं अन् 'हा' मोठा घोटाळा बाहेर आला; बीएमडब्ल्यूमधील 'त्या' व्यक्तीचं भयंकर सत्य

**पुणे । प्रतिनिधी**

लोणावळ्यातील एका धक्कादायक प्रकारातून सराईत गुन्हेगाराला मिळालेल्या शस्त्र परवान्याचा घोटाळा उघड झाला आहे. पिस्तूल दाखवून तरुणीला धमकावल्याच्या घटनेनंतर पोलिसांनी केलेल्या तपासात खोटा पत्ता, बनावट भाडेकरार आणि चुकीचे शपथपत्र देऊन शस्त्र परवाना मिळवल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

सीसीटीव्हीतील धक्कादायक दृश्य

लोणावळा येथे मॅफको गार्डनसमोर उभ्या असलेल्या बीएमडब्यू कारमधून उतरलेल्या व्यक्तीने एका तरुणीवर पिस्तूल रोखून धमकावल्याचा प्रकार काही दिवसांपूर्वी घडला होता. या



घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ शोधमोहीम सुरू केली. तपासादरम्यान संबंधित तरुण आणि तरुणी दोघेही एका फार्म हाउसवर आढळून आले. तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, भूषण ऊर्फ राहुल रामचंद्र तारू हा तिचा परिचित असून, दोघांत वादावादी झाल्यानंतर त्याने मारहाण करून तिच्यावर पिस्तूल रोखून धमकी दिल्याचे तिने सांगितले.

सराईत पार्श्वभूमी, तरीही परवाना

या घटनेनंतर पोलिसांनी भूषणची सखोल माहिती घेतली असता, तो सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. मग त्याला शस्त्र परवाना मिळाला कसा, याचा तपास सुरू झाला. पोलिस तपासानुसार, भूषण ऊर्फ राहुल याने ४ नोव्हेंबर २०२२ रोजी पुणे पोलीस आयुक्तालयाकडे शस्त्र परवान्यासाठी अर्ज केला होता. त्याने लोणी काळभोर येथील स्वप्नशील सोसायटीमध्ये वास्तव्यास असल्याचे दाखवणारा खोटा भाडेकरार, शपथपत्र व कागदपत्रे जोडली. प्रत्यक्षात तो कधीही त्या पत्त्यावर राहात नसल्याचे स्पष्ट झाले. आरोपीविरुद्ध सहकारनगर पोलीस ठाण्यात २०००, २००६, २०११ मध्ये गुन्हे दाखल आहेत, तसेच बंडगार्डन पोलीस ठाण्यातील गुन्हे नोंद असूनही अर्ज करताना त्याने ही माहिती लपवली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम १८१, ४२०, ४६५, ४७१ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे, तसेच पिस्तूल दाखवून धमकावल्याच्या घटनेबाबतही लोणावळ्यात स्वतंत्र गुन्हा दाखल आहे. शस्त्र परवानाप्रकरणी आम्ही पुणे पोलीस आयुक्तालयाला पत्र पाठवले आहे. त्याप्रमाणे ते पुढील कार्यवाही करतील.

# आरटीई प्रवेशासाठी शाळा नोंदणी व व्हेरिफिकेशनला मुदतवाढ; जानेवारीपर्यंत अंतिम संधी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे राबविल्या जाणाऱ्या आरटीई प्रवेश ९ ते १९ जानेवारीनंतर २० ते २७ जानेवारी दरम्यान शाळा नोंदणी तसेच व्हेरिफिकेशनची कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतु, शाळा नोंदणी न झाल्यामुळे आता ते जानेवारीदरम्यान अंतिम मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती प्राथमिकचे संचालक शरद गोसावी यांनी दिली आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे शिक्षण कायद्यांतर्गत आरक्षित जागांवर ऑनलाइन आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवली जाते. त्यानुसार या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याच्या अनुषंगाने जानेवारीपासून विनाअनुदानित व स्वयंअर्थसाहाय्यित शाळा नोंदणी आणि शाळा व्हेरिफिकेशनची लिंक सुरू करण्यात आली आहे. सध्या हजार शाळांची नोंदणी झालेली असून हजार हजार जागा उपलब्ध झाल्या असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शाळा नोंदणीनंतरचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा शाळा व्हेरिफिकेशनचा असतो. तरी या अनुषंगाने सर्व संबंधितांनी शाळा व्हेरिफिकेशन करताना, बंद करण्यात आलेल्या शाळा, अल्पसंख्याक दर्जा शाळा, अनधिकृत शाळा तसेच स्थलांतरीत




झालेल्या शाळा आरटीई प्रवेश सन मध्ये प्रविष्ट होणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी. याबाबत सर्वस्वी जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्यावर निश्चित करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच शाळा मान्यता ज्या मंडळाची आहे तेच मंडळ शाळेने नोंदणी करताना निवडले आहे का याची खात्री करण्यात यावी. (उदा. शाळा मान्यता राज्य मंडळाची आहे व शाळेने नोंदणी करताना केंद्रीय मंडळ निवडले आहे.) तरी संबंधित सूचनांचे पालन करून दिलेल्या कालावधीमध्ये विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळा नोंदणी व शाळा व्हेरिफिकेशनची कार्यवाही पूर्ण करावी ही शेवटची मुदतवाढ असून यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# ई-गव्हर्नन्स सुधारणेमध्ये पीएमआरडीए तृतीय क्रमांकावर; मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांची कामगिरी भारतीय गुणवत्ता परिषद यांच्या वतीने अंतिम मूल्यमापनात तपासली गेली. या मूल्यमापनात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यालयांची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली. यामध्ये पीएमआरडीएने सर्वोत्तम शासकीय संस्था, मंडळे व कंपन्या या गटातून राज्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे, तर पुणे विभागात प्रथम क्रमांक मिळवून मानाचा तुरा खोवला आहे.




महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्या नेतृत्वाखाली पीएमआरडीएने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे. कार्यालयाची अधिकृत वेबसाइट, 'आपले सरकार' प्रणाली, ई-ऑफीस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन तसेच भौगोलिक माहिती प्रणाली यांचा शासकीय कामकाजातील प्रभावी वापर करून ही निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यापूर्वी १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा व धोरणात्मक निर्णयांवर आधारित कार्यक्रम जाहीर केला होता. त्या स्पर्धेतही पीएमआरडीएने राज्यात तृतीय क्रमांक पटकावत आपली कामगिरी अधोरेखित केली होती. या यशानंतर जून २०२५ मध्ये १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कृती आराखडा घोषित केला गेला. या आराखड्यांतर्गत राज्यातील शासकीय कार्यालयांचे दहा विविध स्तरांवर मूल्यमापन करण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात भारतीय गुणवत्ता परिषदेकडून सखोल तपासणी केली गेली.

# ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात पुणे दुसऱ्या क्रमांकावर; 'या' सात सर्वंकष निकषांवर झाले मूल्यमापन

**पुणे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री यांच्या १५० दिवस ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये प्रशासनिक सुधारणा करण्याच्या उद्देशाने स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत कार्यालयांची संकेतस्थळे, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन माहिती फलक, व्हॉट्सप संवाद प्रणाली, शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता व ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर तसेच भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर अशा सात सर्वंकष निकषांवर मूल्यमापन करण्यात आले.

या कार्यक्रमातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यालयांची निवड प्रजासत्ताक दिनी जाहीर करण्यात आली.१५० दिवस ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत पुणे महानगरपालिकेने नव्या तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक संकेतस्थळ विकसित केले आहे. नागरिकांसाठी ऑनलाइन सेवा पोर्टल, तक्रारींचे विश्लेषण व व्यवस्थापन, व्हॉट्सपद्वारे सेवा, तक्रार निवारण तसेच माहिती देण्यासाठी नागरिकाभिमुख प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

तसेच, पालिकेच्या विविध प्रकल्पांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व भौगोलिक माहिती प्रणालीवर आधारित



तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आला आहे.राज्यातील २९ महापालिकांच्या झालेल्या मूल्यमापनात पुणे महानगरपालिकेला २०० पैकी १८६.२५ गुण मिळून राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले. महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) पवनीत कौर आणि अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत हे कामकाज करण्यात आल्याची माहिती माहिती तंत्रज्ञान प्रमुख राहुल जगताप यांनी दिली.

# मद्यधुंद स्कूल बस चालकाची अनेक वाहनांना धडक; वाघोलीमधील बाईफ रोड वादाच्या भोवऱ्यात

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील वाघोली परिसरात काल दुपारी अडीच ते पावणे तीन वाजण्याच्या सुमारास एक भीषण आणि धक्कादायक अपघात घडला. इंडो स्कॉट ग्लोबल स्कूलची (बायफ रोडवरील) स्कूल बस चालवताना बसचालक मद्यधुंद अवस्थेत होता.या बसने रस्त्यावरून जात असताना चार दुचाकीस्वार आणि एका कारला जोरदार धडक दिली. धडकेनंतर बसने या वाहनांना काही अंतर फरफटत नेल्याची माहिती समोर आली आहे.



या अपघातात सुदैवाने कोणत्याही व्यक्तीला गंभीर जखम झाली नाही किंवा जीवितहानी झाली नाही. बसमध्ये ३० ते ४० विद्यार्थी होते, ज्यांना घेऊन चालक घरी सोडण्यासाठी निघाला होता. मात्र, मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्याने ही घटना घडली, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ प्रतिसाद दिला. ते ओरडा-ओरडा करत बसच्या मागे धावले आणि बस थांबवली. संतप्त झालेल्या नागरिकांनी बसचालकाला चोप दिला आणि त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. गर्दी जमली आणि काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी बसचालक बत्ता वसंत रसाळ (वय ५० वर्षे, रा. वाघोली) याला तात्काळ अटक केली आहे. या प्रकरणी पोलिस कर्मचारी प्रशांत भगवान धुमाळ (वय ३६) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. स्कूल बस चालकांनी मद्यपान करून वाहन चालवणे हे अत्यंत गंभीर आणि अस्वीकार्य आहे. अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी स्कूल प्रशासनाने चालकांची नियमित तपासणी, ब्रेथलाइझर चाचणी आणि फिटनेस प्रमाणपत्रांची काटेकोर तपासणी करणे आवश्यक आहे. पालक आणि नागरिकांनीही अशा घटनांबाबत सजग राहून तक्रार नोंदवणे गरजेचे आहे.

# दोष असतांनाही त्याच विमानाचा वापर ? तपासात समोर आलेले खुलासे हादरवणारे

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबईहून बारामतीकडे जात असताना लँडिंगच्या वेळी झालेल्या या अपघातात अजित पवार यांच्यासह विमानातील इतर चार जणांचाही मृत्यू झाला.दरम्यान, तपासात समोर आलेले प्राथमिक खुलासे अतिशय धक्कादायक आहेत. अजित पवार ज्या Learjet ४५ मॉडेलच्या चार्टर्ड विमानात (तढ-डडघ) बसले होते, त्याबाबत अमेरिकेच्या छढडइ ने यापूर्वीच लँडिंग गिअरमध्ये दोष असल्याचा इशारा दिला होता.

तातडीने तपासणीचे आदेश दिले होते. तरीही त्याच विमानाचा वापर करण्यात आला, ज्यामुळे विमान कंपनीच्या सुरक्षितता प्रोटोकॉलवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.अपघाताच्या वेळी बारामतीत कमालीचे दाट धुके होते. बारामतीसारख्या छोट्या विमानतळावर उपलब्ध नसल्याने वैमानिकाला केवळ दृश्यमानता आधारावर लँडिंग करावे लागते.

धुक्यामुळे धावपट्टी दिसत नसल्याने



वैमानिकाने पहिल्या प्रयत्नात लँडिंग सोडले आणि आकाशात घिरट्या घालून दुसऱ्यांदा प्रयत्न केला. मात्र, जवळपास १०० फूट उंचीवर असतानाच विमानाचे संतुलन बिघडले आणि ते रनवेपासून बाजूच्या जमिनीवर आदळले.

आदळताच भीषण स्फोट झाला आणि आग लागली, ज्यामुळे मदतीची कोणतीही संधी उरली नाही. अपघाताच्या काही सेकंद आधी वैमानिकाने M-YD-Y कॉल जारी केला होता, ज्याचा अर्थ अत्यंत आणीबाणीची स्थिती असते. यावरून वैमानिकाला तांत्रिक बिघाड किंवा नियंत्रण गमावल्याची जाणीव झाली होती, पण विमान सावरता आले नाही. बारामतीचा रनवे 'टेबल टॉप' प्रकारचा असल्याने अशा परिस्थितीत अचूक लँडिंगसाठी अत्यंत सावधगिरी आणि अचूकता आवश्यक असते.

या अपघाताची ऊश्चछ- आणि -- खइ मार्फत सखोल चौकशी सुरू झाली आहे. राज्य सरकारने ३ दिवसांचा राजकीय शोक घोषित केला असून, अजित पवार यांच्या पार्थिवावर उद्या अंत्यसंस्कार होणार आहेत. या दु:खद घटनेने महाराष्ट्राच्या राजकारणावर मोठा आघात बसला आहे.